




डॉ. सरोज सहस्त्रबुद्धे

# ओंजळी उधळीत मोती





सादर करत आहे

# ओंजळी उधळीत मोती

## डॉ सरोज सहस्त्रबुद्धे

# ओंजळी उधळीत मोती

लेखिका - डॉ सरोज सहस्रबुद्धे
14 The Coppice, Blackburn, BB2 7BQ, UK
Email id – drsaroj777@gmail.com
WhattsApp - +44-7952592212

काही छायाचित्रे गुगलवरून साभार.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**ओंजळी उधळीत मोती**

**प्रकाशक – ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

9869674820 (Whatsapp for free ebooks)

प्रकाशन : २० ऑगस्ट २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# ओंजळी उधळीत मोती

डॉ सरोज सहस्रबुद्धे

# परिचय

## डॉ सरोज सहस्रबुद्धे



- जन्मगाव, माहेर आणि शालेय शिक्षण – धुळे
- संगीताची बालपणापासून आवड – शालेय जीवनात गांधर्व महाविद्यालयाच्या उपांत्यविशारद पर्यन्त चार परीक्षा (प्रथम श्रेणीत उत्तीर्ण)
- शिक्षण – BSc (प्रताप कॉलेज, अमळनेर. प्रथम आल्याबद्दल कॉलेजचे पारितोषिक)
 - MSc व PhD च्या पदव्या – व्हिक्टोरिया युनिवर्सिटी, मॅंचेस्टर, इंग्लंड (जीवशास्त्र
 विषयात पाच वर्षे संशोधन करून)
- अनुभव – सात वर्षे मॅंचेस्टरच्या क्रिस्ती कॅन्सर हॉस्पिटलमधे संशोधन क्षेत्रात कार्य
- इंग्लंडमधील १७ वर्षांचे (१९६४-१९८०) वास्तव्यात अनेक गायक व इतर कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करण्यात माझे यजमान व माझा प्रमुख सहभाग असे.
- भावसंगीत, शास्त्रीयसंगीत, हार्मोनियम, कीबोर्ड, व्हायलिन व सतार ह्यांचेमधे अल्पसे प्राविण्य.
- १९८० ते २०१० पुण्यात स्थायिक. त्या काळात कॅन्सर शिक्षणाच्या प्रचाराचे कार्य – सुमारे शंभर लेख व लेखमाला विविध मराठी दैनिके व मासिकांमधून प्रसिद्ध. तसेच कॅन्सर आणि आरोग्य या विषयांवरची अकरा पुस्तके मराठीमधून प्रकाशित.
- आरोग्याव्यतिरिक्त, संगीत, चित्रकला, काव्य, नृत्य, प्रवासवर्णने इत्यादी विषयांवर ललित लेखन (पुणे व इंग्लंड)
- संगीताची आत्यंतिक आवड. उत्कृष्ट संगीत ऐकणे आणि त्यांचा संग्रह जोपासणे हा वर्षांनुवर्षांचा छंद
- होमिओपॅथी, मॅग्नेटोथेरपी, योगासने, फोटोग्राफी, ज्योतिष, आध्यात्म, वाचन, संगणक इत्यादींची आवड
- २०१० पासून इंग्लंडमधे पुन्हा वास्तव्य

# पुस्तकाच्या अंतरंगाबद्दल

- साधारण कॉलेजजीवनापासून (१९६० चे आसपास), पुढची सहा वर्षे या लेखनाचा कालखंड आहे. पहिले दोन लेख भारतामधले तर त्यापुढचे सर्व इंग्लंडच्या वास्तव्यामधले.

- त्या काळात भेटलेल्या व्यक्ती, घडलेले प्रसंग, आणि मनावर उठणारे विविध भावतरंग यांच्या मिश्रणातून साकार झालेल्या आठवणींचा कॅलिडोस्कोप, म्हणजेच : **ओंजळी उधळीत मोती**

- संमिश्र विषयांवरचे लघुनिबंधच ! चार लेखांना यापूर्वी मासिकांमधून दुनिया दिसलेली, पण बाकी तीन, वाचकांसमोर येण्याची प्रतीक्षा करीत इतकी वर्षे बंदिस्त राहिलेले.

- परदेशात दीर्घकाळ घालवूनही, आपण भारतीय, विशेषतः मराठी माणसं, मनानं आपल्या बांधवांशी, नातेवाईकांशी किंवा संस्कारांशी किती घट्टपणानं आणि मायेनं जोडले गेलेलो असतो, याचाही जाता जाता एखाद्या लेखात आवर्जून उल्लेख.

- दिवस – महिने – वर्षे पुढे जातच असतात. पण नवरसांमधे नाहून निघालेल्या विविध प्रसंगांच्या आठवणी मात्र, प्रत्येकाच्या मनात आयुष्यभरच रेंगाळत रहातात. अशा अनेक भाव-भावनांचाच हा छोटासा नजराणा !

# मनोगत

रोज दिवसभरात आपण छोटे मोठे प्रवास करीत असतो. कधी पायी, वाहनांनी, बसमधून किंवा इतरही प्रकारांनी. ताणतणाव हलके व्हावेत म्हणून मधूनच विनोदही करतो, ऐकतो, किंवा आजूबाजूला बघतो. निसर्गाची विविध रूपं आणि पानंफुलं तर अतिपरीचयाचीच असतात. त्यांचा आनंद दिवसभरात अल्पशी का होईना, सुखसंवेदना देवून जातो (चित्रात तरी). त्याशिवाय, इतर कामे चालू असतानाच मनाशी वेगवेगळ्या तुलनाही करीत असतो. व्यक्तींच्या, प्रसंगांच्या, नाहीतर अगदी बिनबुडाच्या काल्पनिक सुद्धा !

कधी दिसभरात सुखाचं पारडं वर जातं, तर कधी दुखा:लाही सामोरं जावं लागतं. चोवीस तासांच्या प्रवासात हे असंच काहीतरी घडत असतं. आणि त्यालाच आपण म्हणतो “ याला जीवन ऐसे नाव.”

लहानपणी आम्हा चार भावंडांचं (तीन बहिणी आणि एक भाऊ) एकमेकांशी खूपच सख्य होतं. रोज संध्याकाळी अंगणात,जाई-जुईच्या फुललेल्या मांडवाखाली बसून, आम्ही दिवसभरामधल्या विविध विषयांवर चर्चा करायचो. प्रत्येकाच्या आवडीचे विषय अर्थात वेगवेगळे असत. मोठ्या बहिणीला वाचनाची आणि हस्तकला - भरतकला यांची आवड, मधल्या बहिणीला खेळ, नाटक, सिनेमे, गाणी इत्यादींमधे अधिक रस होता. धाकट्या भावाला भटकंती, सहली आणि मित्रमंडळी जमवण्याची ओढ, तर मला

जवळपास सगळ्याच विषयांचं आकर्षण वाटत असे. ‘‘एक ना धड भाराभर चिंध्या’’ या म्हणीप्रमाणेच सर्वजण माझ्या आवडींकडे बघत असत. त्यामुळे, jack of all trades and master of none अशीच माझी अवस्था आयुष्यभर राहिली. अनेक विषय हाताळूनही ‘‘प्राविण्य’’ कशातच मिळवता आलं नाही. पण काहीतरी नवीन शिकतो आहोत, आत्मसात करण्याचा प्रयत्न करीत आहोत याबद्दलचं आत्मिक समाधान मात्र भरपूर मिळालं (अजूनही एखाद्या नव्या विषयाची विशेष माहिती मिळाली तर तितक्याच आनंदानं मी त्यात गुंतून जाते)

आई – वडिलांचा पाठिंबा आणि प्रोत्साहन तर आपण नेहमी गृहीतच धरीत असतो. आम्हा भावंडांनाही घरातून कुठल्याच गोष्टींसाठी विरोध झाला नाही. पण प्रत्यक्षात पालकांनी कधी भरभरून कौतुकही केलं नाही. त्यांची अशी धारणा होती की, तुम्ही काही चांगली गोष्ट करीत असाल तर लोकांना त्याबद्दल तुमचं कौतुक करू दे. ते ऐकण्यात आम्हाला जास्त आनंद होईल.

प्रस्तुत पुस्तकामधे समाविष्ट केलेल्या लेखांचा कालखंड साधारण कॉलेज जीवनापासून तो त्यापुढील पाच-सहा वर्षांमधला आहे (शेवटल्या लेखाचा अपवाद वगळता). माझ्या स्वभावाला अनुसरूनच, पुस्तकामधले विषयही वाचकांना मुक्तछंदासारखे वाटू शकतील. म्हणूनच त्यांना एकत्र पकडून ठेवण्यासाठी मी ओंजळीतल्या मोत्यांची उपमा दिली आहे. त्यात प्रामुख्यानं प्रवासवर्णन – विनोद – विचार – अनुभव – अनुभूति – शब्दकाव्य – तुलनात्मक -अशा भिन्न विषयांना एकत्र गुंफण्याचा प्रयत्न केला आहे. तरुण

वयात सुचलेल्या त्या कल्पनांचा काळ आज अर्धशतक ओलांडून पुढे गेला आहे. त्यामुळे, आजच्या techno-savvy जगात वावरणाऱ्या वाचकांना लेखांमधले माझे काही विचार कदाचित बालिश किंवा बाळबोध वाटण्याची दाट शक्यता आहे. पण आयुष्यामधला तो काळच इतका रम्य आणि उत्साहानं ओसंडणारा असतो की आकाश कवेत घ्यावंसं वाटतं. या मनोधारणेमधून आणि अशा कॅनव्हसवर जर प्रस्तुत लेख वाचले,तर तरुण वाचकांचाही फारसा अपेक्षाभंग होणार नाही. किंबहुना आजची तरुण पिढीदेखील या विषयांमधे स्वतःला शोधू शकेल. कारण काळ कितीही मागचा असला तरी मनुष्यस्वभावाचे नमुने फारसे बदलत नाहीत.

"माझ्या वैयक्तिक आयुष्याची वाटचाल" हा जरी या पुस्तकाचा विषय नसला, तरी पुस्तकात समाविष्ट केलेल्या लेखांची पार्श्वभूमी तयार होत असतांना, आपोआपच गतजीवनाचा सारिपाट विविध छटांमधे उलगडला जाऊन समोर येत होता. त्यामुळे काही वैयक्तिक प्रसंगांचा उल्लेख टाळणं केवळ अशक्यच होतं. आयुष्याची आजपर्यंतची वाटचाल भारत-इंग्लंड अशा आंदोलनांमधेच गेल्यामुळे मायबोलीवरही थोडासा पश्चिमी असर झाला आहे. पण त्याबद्दल चोखंदळ मराठी वाचक दिलदारपणे माफ करतील अशी आशा आहे.

या लेखप्रपंच्यासाठी तीन व्यक्तींची मी मनापासून ऋणी आहे. त्यांचे कितीही आभार मानले तरी ते कमीच ठरतील - माझा मुलगा डॉ. नील सहस्रबुध्दे, ई-साहित्य प्रकाशनचे आमचे मार्गदर्शक, सल्लागार, हितचिंतक

a

आणि प्रतिष्ठानचे प्रमुख कार्यकर्ते श्री सुनीळ सामंतजी (व त्यांचे सर्व सहकारी) आणि ज्यांनी माझ्या हस्तलिखिताचं टंकलेखनात रुपांतर करून दिलं त्या आत्मन अकॅडेमीच्या श्रीमती सुनिता शर्मा. या सर्वांना माझे मनःपूर्वक धन्यवाद !

# अर्पणपत्रिका



**आमच्या बागेतल्या सुंदर सुंदर फुलांना,**

**त्याचप्रमाणे**

**वृक्षवेली आणि पानाफुलांनी डंवरलेल्या निसर्गावर,**
**भरभरून प्रेम करणाऱ्या-**
**विश्वामधल्या तमाम रसिक जनांच्या-**
**कोमल सहृदयी कविमनांना**

**हे शब्दपुष्प मनापासून आनंदानं अर्पण.**

*** सर्वांची मनं फुलांसारखी सदैव ताजीतवानी**
**आणि प्रफुल्लित राहोत हीच सदीच्छा ! ***

a

# अनुक्रमणिका

## ओंजळी उधळीत मोती


| | | |
|---|---|---|
| लेखांक १ | तोरणमाळ - संस्मरणीय सहल | 15 |
| लेखांक २ | वाऱ्यांशी लागेबांधे - एक विनोद | 24 |
| लेखांक ३ | निसर्गाची मनोहारी किमया | 43 |
| लेखांक ४ | फुलांच्या भाषा आणि भावना | 57 |
| लेखांक ५ | फिरुन फिरुन सय येते – जीव वेडावतो | 77 |
| लेखांक ६ | हा किनारा - तो किनारा | 85 |
| लेखांक ७ | जलगौरी – सुरम्य आठवणी | 100 |

# ओंजळी उधळीत मोती

# लेखांक १

# तोरणमाळ – संस्मरणीय सहल

## पार्श्वभूमी

खाली वर्णन केलेलं-मला आठवणारं आणि कॉलेजजीवनात असतांना, कॉलेजच्या मासिकासाठी लेखणीतून उतरलेलं तोरणमाळ !

आज इतक्या वर्षांच्या नंतर, त्या डोंगरमाथ्याचा आणि खांदेशमधल्या नंदुरबार-जवळच्या थंड हवेच्या ठिकाणाचा पूर्ण कायापालट झाला आहे. रहाण्यासाठी आधुनिक पध्दतीची निवासस्थाने, थेट तलावापर्यंत स्वतःच्या किंवा इतर वाहनांनी पोहोचण्याची सोय. खाद्यपदार्थांच्या अद्ययावत् सुविधा, प्रत्येक पर्यटकाजवळ कॅमेरा, मोबाईल आणि खूप काही. त्यामुळे केवळ खान्देशच नव्हे तर दूरवरून येणाऱ्या इतर पर्यटकांचही ते आवडतं ठिकाण बनलं आहे. दरवर्षी शेकडयांनी लोक या **“खान्देशचं स्वित्झर्लंड”** म्हणून संबोधल्या जाणाऱ्या निसर्गरम्य परिसराला भेट देतात.

a

मच्छिंद्रनाथांची गुहा आणि मंदिर, कमळं असलेला तलाव, सिताखणी धबधबा, हिरव्यागार वृक्षांची जंगलं आणि कितीतरी. निसर्गसौंदर्याची लयलूटच ! मनुष्यनिर्मित बाकी कितीही सोयीसुविधा झाल्या असल्या तरी, इतक्या वर्षांपूर्वी आम्हाला भुरळ घालणारा निसर्ग मात्र आहे तसाच आहे.

माणसं बदलतात, नवीन येतात, विचार बदलतात, कल्पना पुढे सरकतात पण निसर्ग मात्र (माणसाच्या विध्वंसातनं वाचला तर !) जागचे जागीच असतो. निसर्गसौंदर्य ही अशी चीज आहे की जगभरच्या सगळ्याच लोकांना त्याची भुरळ पडते.

पन्नास वर्षांपूर्वीही तोरणमाळ परिसरातल्या नितांतसुंदर रमणीय निसर्गानं आम्हाला अशीच भुरळ घातली होती, वेडंपिसं बनवलं होतं. तेच निसर्गसौंदर्य आजची तरुण पिढीही तितक्याच इंटरेस्टने पसंत करते आहे, याचा मनापासून आनंद होतो आणि **“A thing of beauty is a joy forever”** याची प्रचीती येते !


## तोरणमाळ – संस्मरणीय सहल

कुठेसं वाचल्याचं आठवतं- **Change in work is a rest.** आणि मला वाटतं याच भावनेतून ज्ञान मिळवण्याचं दुसरं एक साधन म्हणून पर्यटनाचा अवलंब केला गेला असावा. त्यांतून तो जर आमच्यासारखा

वनस्पतीशास्त्राचा अभ्यासक असला, तर सहलीकडे पाहण्याची त्याची दृष्टी त्याहूनही थोडी वेगळीच असते. निसर्गसृष्टीशीं त्याची थोडीफार जानपहचान झालेली असतेच; त्यामुळे सफरीवर जाणं म्हणजे जिवाभावाच्या मित्राकडे जाऊन त्याच्याशी हितगुज करण्याइतकीच उत्सुकता असते. किंबहुना जीवशास्त्राचा साकल्यानं आणि मनपसंत अभ्यास करायचा असला, तर डोळे उघडे ठेवून रानावनांत मनसोक्त फिरणं अतिशय जरुरीचं आहे, असं मनापासून वाटतं.

**तोरणमाळ** ! आम्हां खान्देशवासियांचं, थंड हवेच्या ठिकाणाबद्दलचं स्वप्न साकार करूं पाहणाऱ्या सातपुडयांतल्या या स्थानाबद्दल बऱ्याच दिवसांपासून निरनिराळ्या गोष्टी कानांवर येत होत्या. आणि तसतशी आमची उत्सुकता शिगेला पोहोचत होती. शिवाय वनस्पतीशास्त्राच्या अभ्यासकांच्या दृष्टीकोनांतून निरीक्षिला 'न' गेलेला हा प्रदेश आहे असं कळल्यानंतर तर, आमचं औत्सुक्य अगदी ओसंडून वहायला लागलं.

बाहेर थंडीचा कडाका पडायला लागतांच आमच्यांत आशेची आणि उत्साहाची ऊब निर्माण झाली आणि अखेर १८ डिसेंबर १९६० च्या पहाटे तोरणमाळच्या जबरदस्त ओढीनं आम्ही विद्यार्थी, शिक्षक आणि दोन सहाय्यक यांनी अमळनेर सोडलं (विद्यार्थिनी मी एकटीच असल्याने, पुढे मोठ्या बहिणीला बरोबर घेतलं).



तोरणमाळला निघण्यापूर्वी कॉलेजच्या प्रांगणात

a

दोंडाइच्यापर्यंतचा प्रवास रेल्वेनं केल्यानंतर, दोंडाइचा ते राणीपूर-पर्यंतचा प्रवास बसनं करून आम्ही एकदाचे राणीपूरला पोहोचलो.

राणीपूरच्या बस-स्टँडवर आम्ही उतरतो तोच, जत्रेतल्या चित्रविचित्र वस्तू पहाण्याकरता गर्दी जमावी, तसे भोवतालचे झाडून सारे खेडूत आमच्याभोंवती जमा झाले ! मात्र त्यांना तरी नांवं कशाला ठेवायची? आपण शहरी लोकसुध्दां नाही कां एखादा सिनेनट अचानक रस्त्यांत दिसला तर त्याच्याभोंवती गराडा घालीत? जेमतेम ६०-७० झोपडयांचं ते छोटंसं खेडं म्हणजे भारताच्या छोटया घटकाचं एक प्रतीकच आहे. आपल्या गुंठे-दीड गुंठे शेतांत खपून, कसाबसा उदरनिर्वाह करणारे श्रमजीवी लोक, तिथले रहिवासी आहेत. त्यांच्या जीवनाचं क्षेत्रही अतिशय संकुचित आहे. बाहेरच्या जगाशी त्यांचा संबंध येतो केवळ एस.टी. च्या जाण्या-येण्यामुळे. आणि तोही दिवसांतून काय तो दोनदां. रहदारी बंगल्याच्या व्हराडयांत, राणीपूरची सक्तीची प्राथमिक शाळा भरते. सगळीच्या सगळी मुलं हजर असतात, तेव्हां संख्या कशीबशी दहा होते ! जळण जमवण्याचं किंवा गुराख्याचं काम करण्यांत लहानपणापासून रानावनांत भटकणारीं स्वच्छंदी मुलं ती ! शाळेबद्दल, शिक्षणाबद्दल किंवा शिक्षकांबद्दल त्यांना कितीशी आत्मीयता असणार?

राणीपूरपासून तोरणमाळ १८-२० मैल आहे. कच्चा रस्ता तयार करण्याचं काम नुकतंच सुरू झालं आहे. जीप किंवा बैलगाडी यांच्याशिवाय कोणतंच वाहन या रस्त्यावरून जाणं शक्य नाही; आणि यापैकी एकही साधन हाती न आल्यानं “पायांची गाडी” करून रस्ता पार करणच काय ते आमच्या

a

'पायी' राहिलं होतं. राणीपूरपर्यंतचा प्रवास सुखाचा झाला होता आणि पुढच्या कष्टांच्या नुसत्या कल्पनेनंही मन गांगरलं होतं. कदाचित् आमच्या प्रवासांत हे असंच घडायचं असेल. **"भोगावे सुख सारखे महिवरी हे नावडे ईश्वरा,"** आणि म्हणूनच त्याची आंखणीच अशी असते की, **"संसारी सुखदुःख सोदर...."** या दण्डकान्वये काहीं प्रवास सुखाचा झाल्यानंतर आतां आमची कष्ट भोगण्याची वेळ आली असावी.

सकाळची न्याहारी उरकली आणि साडे -अकरा वाजतां आम्ही तोरणमाळचा रस्ता धरला. कच्चा रस्ता तुडवीत उन्हांतून जाण्यापेक्षा जंगलातून पायवाटेनं जाण्याचंच आम्ही ठरवलं. सगळी वाट रानमाळांतूनच असल्यामुळे, ऊनसांवलीच्या छुपा- छुपींतच आम्ही चाललो. छायेतून जातांना थंडी वाजून येई, तर उन्हांतून जातांना त्याची तिरीप नकोशी वाटे. वाटेत मधेच सागाचं जंगल लागे. पावसाळयाच्या मोसमात यौवन-पल्लवींनी बहरून येऊन सागवृक्षांनी कदाचित आमची वाट पाहिली असेल, आणि आतां त्या थकल्या-भागल्या साजशृंगाराचा झालेला पालापाचोळा उतरू लागला असावा. वास्तवात असाच साऱ्यांचा जीवनक्रम नाहीं कां? आयुष्याच्या पूर्वार्धांत आकांक्षा, उत्साह; मध्यान्हांत स्थैर्य तर उत्तरार्धात जीवनाबद्दलची अनासक्ति ! अशीच तर निसर्गरहाटी असते.



## सागवृक्षांनी त्याग केलेला पानांचा शृंगार


कधींमधीं रस्त्याच्या दुतर्फा दाटीवाटीनं उभी असलेली कारवीची लहानमोठीं झाडेंच झाडें दिसत. आडुळशाच्या जातीची आणि अंगयष्टीची ही वनस्पती म्हणे नऊ वर्षांनी एकदांच काय ती फुलां-फळांनी बहरून, आपल्या जीवन-तपस्येचं निर्वाण गांठतें. आम्हीं या वाटेनं यायला आणि कारवीनं उमलायला एकच गांठ पडली होती. किती योगायोगांच्या गोष्टी असतात या ! निलगिरी पर्वतावर आपल्या निळसर रंगाचा मुलामा ठेवणाऱ्या कारवीचं कौतुकही वाटलं. काव्याइतकंच सत्यही आहे तर त्यांत !





कारवीची फुलं

डोंगरांवर फुलणारी कारवीची फुलझाडं



a

सुरु केलेल्या उंचसखल रपेटीत, तोरणमाळच्या पायथ्याशी असलेल्या एका टप्प्यावर आम्ही एकदाचे पोहोचलों. त्यावेळी दुपारचे चार वाजले होते. आतां काय तो ४-५ मैलांचा प्रवास राहिला होता. मात्र त्यासाठी, आमच्यासमोर कडयासारखा खडा राहिलेला डोंगर चढावा लागणार होता. त्या पर्वताचं ओझं छातीवर असह्य वाटत होतं.०"जणूं कांही आमचे ते कोणीच नव्हेत" या वृत्तीनं पायही मुरगळत होते.

राणीपूरपासून तोरणमाळवर जाणारी कच्ची सडक बनवणारे ७०० कामकरी आणि त्यांच्यावर देखरेख करणारे तंत्रज्ञ यांनी या ठिकाणी हंगामी वसाहतच केली आहे. जागेचं नांव 'काळापाणी' आहे. तिथल्या अधिकाऱ्यांपैकी कांही आमच्या प्रताप कॉलेजचे पूर्वीचे विद्यार्थी निघाले. त्यांनी आमचं आदरातिथ्य करून चहापाण्याची सरबराई केली. थोडावेळ तिथं विसावा घेऊन आम्ही चढणीच्या वाटेला लागलों. डोंगरमाथ्यावर सरपणफांटा गोळा करण्याकरतां गेलेले आजूबाजूच्या खेडयांतले भिल्ल, पावरी, स्त्री-पुरुष माघारी वळत होते. ते आमच्या दमछाटीकडे आणि घामाघूम झालेल्या चेहऱ्यांकडे पाहून मिष्किलपणें हसत, आम्हांला आपल्या असहायतेची लाज आणीत होते.



**सरपणफांटा गोळा केलेल्या स्त्रिया**



या गिर्यारोहणांतील आमची दैना न बघवूनच की काय, रविराजही आपलें मुखमंडल कडेकपारीआड लपवूं लागले होते. कां त्यांत इतका साधासुधा हेतू नव्हताच त्यांचा ? तर बालकवी सुचवतात त्याप्रमाणे –

**“गेला झाला दृष्टिआडही सूर्य तरी अजुनी,**

**पहा चमकते प्रेमपताका पश्चिम दिग्वदनी |**

**थक्क होउनी दिशा म्हणाल्या काय मोहिनी ही !**

**प्रेमसमाधी अजुनि खुळीची या उतरत नाहीं !"**

(पण या गोष्टी आपण कोण ठरवणार? त्या तर संध्या-दिनकरालाच ठावूक!

अखेर तोरणमाळच्या पठारावरच्या बंगली आम्हांला दिसल्या. इतके दिवस ऐकलेल्या आणि मनामधे चित्रित केलेल्या तोरणमाळचं प्रत्यक्षांत दर्शन झालं, या भावनेनं कृतकृत्यता वाटली. तोरणमाळवर सरकारनं उभारलेली निवासस्थानं, प्रवाशांना सोईस्कर आणि सुटसुटीत अशी आहेत. आमच्या तिथल्या वास्तव्याला त्यामुळे खूपच सुगमता आली. भोवतालचं वातावरण अत्यंत निसर्गरम्य आणि शांत होतं. आधुनिक पध्दतीचं निवास्थान आणि त्यासमोरचा पुराण वटवृक्ष यांत नव्या-जुन्यांचा संगम झाल्यासारखं वाटत होतं. तोरणमाळचं सगळं वैभव जर कुठे एकत्रित झालेलं पहायला मिळत असेल तर तें इथल्या दोन मैल व्यासाच्या निर्मळ आणि गंभीर तलावांत. लहान लहान डोंगरी उंचवटे, हिरवीगार शेतं आणि झुडुपं, वृक्षांच्या रांगा यांनी अवगुंठलेलं हें निळं तळं म्हणजे वनराणीच्या मनगटावर हिरव्या कोंदणांत बसवलेला 'नील' मणीच वाटावा. उगीच नाही आमचे मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांनी एवढी पायपीट करून तोरणमाळच्या या तलावाचं **'यशवंत'** हे नामाभिधान केलं.



## तोरणमाळची काही विलोभनीय दृश्यं आणि नकाशा

तलावाला दोन निमूळती टोकं आहेत की काय कोणजाणे, पण त्याच्या परिघाच्या वरच्या बाजूवर उंचवटे आणि खालच्या कडेवर वृक्षपल्लवींची सांवलीदार उभार यांच्यामुळें काजळ घातलेल्या निळयाभोर नेत्रांची आठवण

a

व्हावी. संध्याकाळ झाली होती. सरोवराच्या स्फटिकासारख्या पाण्यांत सूर्यास्ताच्या वेळी पडणारं गहिरी रंगाचं अतिशय मनोहारी दृष्य दिसलं. आणि मला झटकन साक्षात्कार झाला –

**“त्रिभुवनीचें तेज एकवटलें | बरवेपण सिगेसि आले |**
**दोन्ही पातयांनी धरिलें | ‘हेच ते’ नेत्र” श्रीहरीचे ||**

**तोरणमाळचा यशवंत तलाव**



हळुहळू उगवायला लागलेल्या चांदण्यांनी तो सगळा जलाशय ओसंडू लागला होता आणि त्याकडे पहात बसावं असं वाटत होतं. आता मात्र ३४००

फूट ऊंचीच्या तोरणमाळचा गारठा चांगलाच जाणवूं लागला होता. श्रमांनी आणि थंडीमुळे पायांची जाणीवच नाहींशी झाली होती. पोटांत भुकेचा लोळ उठला होता. पण आमच्याजवळचं खाद्यसामान अजून मागेच राहिलं होतं. तहान लागल्यावर विहीर खणायला जावं, असंच काहीसं झालं. तिथे वास्तव्य करणाऱ्या एकुलत्या एक रखवालदाराजवळ आम्ही या कातरवेळी खाद्यपदार्थ मिळण्याबाबत चौकशी केली; तर, साळ चरडण्यापासून सुरुवात करून, तीन तासांनी त्यानं आम्हांला पानावर बसवलं आणि फक्त भात खाऊं घातला.

रात्रभर थंडी कडाडून पडली होती. सकाळी कशी कोण जाणे मला लवकरच जाग आली. कालच्या लांब पल्ल्याच्या पायी प्रवासाची झळ अंगात कितपत रुतली आहे हें अजमावण्याकरतां थोडं चालून बघावं या कल्पनेनं, बंगल्याचं दार उघडून मी बाहेर येते तो,काय दिसावं दृष्टीला? उजवीकडचा डोंगरमाथा ओलांडून,

**'उमाठयावरी येतसे सूर्य जेव्हां'** तेव्हां –

**'तरूच्या शिरी रंग येई मजेचा**

**मुलामा दिला काय तो सोनियाचा' !**

खरोखरीच तें दृश्य विलोभनीय आणि देहभान विसरवणारंच होतं. तेवढयांत मी यशवंत सरोवराच्या किनाऱ्याशी येऊन पोचले. आरशांत पडावं तितकं स्पष्ट आणि दीप्तीमान असं सूर्यरायांचं प्रतिबिंब पाण्यांत पडलं होतं आणि सेकंदासेकंदाला बदलणारी रंगांची बहार तरी काय वर्णावी..... !

a

अशी काही नैसर्गिक कृति पाहिली की माझ्या हृदयांत नेहमीच उदात्त भाव दाटी करतात. त्या शांतरसाच्या अवगाहनांत अभावितपणे मनांत येतं की:

**‘सुरम्य इतुकी जरी कृति तुझी,**
**तरी तूं किती सुरम्य असशील बा,**
**खुंटतसे मनाची गती’** ||

सकाळी लवकरच वनस्पतींच्या अभ्यासासाठी बाहेर पडलो. तोरणमाळवर अवतीभवती रानवट आणि स्वैर सौंदर्याची लयलूटच आहे जणू.

**‘ऐलतटावर पैलतटावर हिरवाळी घेऊन**
**निळा सांवळा तलाव अपुल्या बाहूंना पसरून**
**चार घरांचे गांव चिमुकले, पैल टेकडीकडे....**
**शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढे,**
**पायवाट पांढरी तयांतुन अडवी तिडवी पडे.**
**हिरव्या कुरणांमधुन चालली शांत तलावाकडे.’**

अभ्यासूवृत्तीनं भटकताना मन समाधानी पण होत होतं,आणि खूप काही बघायचं बाकी आहे याची हुरहुरही वाटत होती. असे तीन दिवस, सकाळ-दुपार हिंडून आम्ही वनस्पतीशास्त्राच्या अभ्यासांत घालवले. सातपुड्याच्या या भागातल्या माळरानांत तोरणा वनस्पतींची इतकी रेलचेल आहे असं म्हणतात, की जाणंत्यांनी या जागेला त्यामुळेच **‘तोरणमाळ’** नांव दिलं असावं.



तोरणा वेली, तोरणमाळच्या

a

जसजसं मनुष्याचं लक्ष या प्रदेशाकडे वळू लागलं आहे, आणि इथपर्यंत रस्ते काढण्याचं, घरं बांधण्याचं काम फैलावू लागलं आहे, तसतशी या माळरानावरच्या तोरणांच्या वैभवाची छाटाछाट उडाली आहे. तोरणा ही बोरीच्या जातीची आहे, मात्र ती एक वेल आहे. वेली म्हटल्या की, साधारणपणे आपल्या नजरेसमोर चित्र उभं रहातं ते जाई-जुई किंवा कृष्णकमळीचं. पण तोरणा त्याअर्थी दुबली-पतली नाही. मधुमालतीप्रमाणे तिची अंगयष्टी जाडजूड, राकट किंवा मनगटाएवढी जाडही नसते. पळस, अर्जुनसादडा, मोहा यासारख्या खंद्या वृक्षांच्या नजीक वाढून आणि त्यांच्या फांद्यांना बिलगून, स्थायी भाव प्राप्त झाल्यावर या वेलींची झुलूपं चौऱ्यांप्रमाणं लोंबत असतात.

तोरणमाळच्या कारवीच्या काडयांच्या झोपडीत वस्ती करून रहाणाऱ्या भिल्ल-पावरी वगैरे आदिवासींची, अतिशय साधी दिनचर्या पण आम्ही जवळून न्याहाळली. त्यांच्या सहजसुंदर जीवनक्रमापासून खूप काही शिकण्यासारखं होतं. शहरी वातावरणापासून योजनं दूर असणारे हे लोक, त्या रानावनांमधे, जंगलांमधे मनसोक्त आनंदानं आणि समाधानानं जगत होते. मुलांच्या अंगावरही अगदी गरीबीचेच कपडे होते पण चेहरे मात्र प्रसन्न आणि हंसरे.



## सातपुडा आदिवासी

तोरणमाळच्या तीन-चार दिवसांच्या सहलीत, सर्वाधिक आकर्षक कोणती गोष्ट वाटली असेल, तर तलावाच्या काठानं हिंडताना-आपल्याच नादात, सुंदरसा रंगीत पिसारा फैलावून अक्षरशः थुई थुई नाचणारे मोर ! डोळ्यांचं पारणं फिटावं असंच ते मनोहारी दृष्य होतं.

रानावनातून भटकतांना भटकंतीचे दिवस कसे भरकन उडून गेले कळलंही नाही. तोरणमाळच्या जंगलातून जमा केलेल्या असंख्य पानाफुलांचे

भरपूर नमुने गोळा झालेले होते. यापूर्वी क्वचितच कुणी आमच्यासारखे वनस्पतीशास्त्राचे अभ्यासक, त्या झाडांना आणि वृक्षवेलींना स्पर्श करून गेले असतील, असं उगीचच वाटून गेलं.

आता परतीचे वेध लागले होते. राणीपूरपर्यंतची १७/१८ मैलांची खडतर वाट, पुनश्च नजरेसमोर तरळायला लागली होती. त्या ओढाळ वाटेनं खाली उतरावं तर लागणारच होतं, पण पाय साथ देतील की नाही ही धाकधूकही मनात होतीच. मी आणि माझी मोठी बहीण वगळता, बाकी सगळी धडधाकट मुलंच होती. त्यामुळे त्यांचेमागे रेंगाळून ‘जो थांबला तो संपला’ अशी आम्हां दोघींची स्थिती व्हायला नको होती.

अखेर एकदाचं रडत-खडत राणीपूर गाठलं आणि आता खऱ्या अर्थी पायपीट संपली, आता बसचा आणि रेल्वेचा सुखाचा प्रवास सुरु होणार या आनंदात, एका भल्याथोरल्या खडकावर, बसची वाट पहात थांबलो.

“तोरणमाळ” चा अवघड डोंगर तर चढ-उतार करून सर झाला होता. आता फक्त बरोबर आणलेल्या सगळ्या पाना-फुलांच्या “तोरणांना” प्रयोगशाळेत नेवून दाखल करायचं बाकी होतं !

तोरणमाळ सहलीच्या एका रोमांचकारी, संस्मरणीय अनुभवानं आमचं भावविश्व सर्वतोपरी संमृद्ध झालं होतं.

# लेखांक २

# वाऱ्यांशी लागेबांधे - एक विनोद

## पार्श्वभूमी

कॉलेजचं शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढची तीन वर्ष मी धुळ्याच्या कमलाबाई कन्या शाळेमधे शिक्षिका म्हणून काम केलं. त्या शाळेचीच मी माजी विद्यार्थिनीही होते. दहावी आणि अकरावीच्या मुलींना गणित, सायन्स आणि भूगोल हे विषय शिकवीत असे. वय साधारण वीस एकवीसच्या आसपास होतं.

माझा स्वभाव एकूणात बराच गंभीर प्रकृतीचा, काहीसा शांत पण लोकांचा सहज गैरसमज होऊ शकेल इतका संकोची आणि अबोल होता. विनोदाचं तर थोडंफार वावडंच होतं असं म्हणायला हरकत नाही. त्यामुळे काहीतरी विनोदी वाचून आपला स्वभाव थोडा बदलता आला तर पहावा, अशा इराद्यानं त्या काळात मी बरीच विनोदी पुस्तकं वाचली.

त्यांचा परिणाम म्हणून की काय पण आपणही काहीतरी विनोदी लिहून बघावं असं मनात आलं. आणि मग एके दिवशी उत्स्फूर्तपणे मी हा विनोदी

लेख लिहिला. पण माझ्या मूळ स्वभावाशी अत्यंत विसंगत असं ते लेखन असल्यामुळे, जवळपासच्या समस्त लोकांना तो एक मोठा विनोदच वाटला.

मात्र जमेची बाजू म्हणजे तो लेख चक्क एका दर्जेदार मराठी मासिकात छापूनही आला आणि खूप लोकांनी तो लेख आवडल्याचं आवर्जून सांगितलं. त्यानंतरही, माझ्या स्वभावाला पेलतील असे तीन-चार विनोदी लेख मी पुढे लिहिले. ते छापलेही गेले. पण दुर्दैवाने, त्यांचेपैकी एकही लेख आज माझे हाती नाही. आहे तो फक्त हा - अगदी पहिला-वहिला विनोदी लेख.

## वाऱ्यांशी लागेबांधे - एक विनोद

वाऱ्यांचा आणि माझा पहिला परिचय झाला तो जन्म झाल्याबरोबरच ! म्हणजे माझा जन्म वाऱ्यांचा नव्हे ! वारे हे कोणी गोरे, घारे, झारे, नवरे या आडनावांच्या मालिकेंत बसणारे गृहस्थ नसून ‘वारा’ या एकवचनी शब्दाचे ते बहु किंवा अनेकवचन आहे, हे प्रथमच स्पष्ट केलेले बरे.अर्थात गैरसमज पसरवण्यासाठी, जन्म झाल्याबरोबरचं वय जरा लहान ठरतं ती गोष्ट वेगळी !

आमच्या जन्माच्या वेळी उकाडा ‘मी’ म्हणत होता म्हणे ! त्यामुळे मातोश्रींनी जन्मतःच अस्मादिकांना जोरजोरात पंख्यानं वारा घालायला सुरुवात केली. त्या काळी दवाखान्यांमधे विजेचे पंखे नसावेत, असं तेव्हांच्या एकूण परिस्थितीवरुन वाटतं – हल्ली पण असतात कीं नाही नक्की माहिती नाही. पण बदलत्या काळाबरोबर कमी होणारा उकाडा हेच त्याचं रास्त कारण

असलं पाहिजे, अशी मात्र माझी पक्की खात्री आहे. सांगायचा मुद्दा असा की, जन्मल्याक्षणीच अंगावरून वाहिलेल्या पंख्याच्या त्या वाऱ्यानं आमचा मेंदू जो थंडावला, तो त्यानंतर पुन्हा कधीही आणि कोणतेही सरळ वारे आपला मार्ग वाकडा करून आमच्या डोक्यापर्यंत पोहोचायला धजले नाहीत.

मातोश्रींनी करून दिलेल्या या वारेसाहेबांच्या परिचयाची परंपरा, आमच्या पितोश्रींनी पुढे चालवली. लहानपणींचे आमचे एकेक अचाट प्रताप पाहून ‘ही मुलगी म्हणजे अगदी अंगात वारे भरल्यासारखीच वागते’ हे पितृवचन वारंवार – वहाणाऱ्या वाऱ्यांसारखे कानी येऊन आदळू लागले आणि नुसतेच सोनाराने फुंकलेल्या नळीप्रमाणे ते वारे या कानांतून शिरून त्या कानांतून सरळ बाहेर ‘‘न’’ पडता अंगात भिनू लागले. परिणामी, ‘वात’ या स्वरूपांत अंगांगावर झळकूही लागले.

अशा रीतीने वाढत्या वयाबरोबर (म्हणण्यापेक्षां वाढत्या आकाराबरोबर म्हणणे अधिक रास्त ठरेल) आमची पावले शाळा या संस्थेकडे वळवली गेली. आणि शिक्षणाची एकेक पायरी वर चढू लागली. येथे तर निरनिराळ्या प्रकारचे वारे जणू पांचवीलाच पूजलेले होते. काव्य व संस्कृत साहित्यांत वहाणारे वारे वेगळे, भूगोलांतील वारे आणिकच वेगळे, एवढंच नव्हे तर शास्त्रासारख्या रुक्ष विषयांवरूनही वारे वहायला लागले. आणि वर्गात हे सारं चालू असतांना, शाळेबाहेरील चिंचेच्या झाडावरून वाहून, चिंचा पाडतांना दिसत ते खरोखरचे वारे आणखी वेगळेच !

a




## वाऱ्यानं हलणारं चिंचेचं झाड

a

भूगोलाचा तास सुरू झाला कीं हातांत नकाशाची गुंडाळी व कांखेत काठी (नकाशा दाखवण्यासाठी) घेऊन भूगोलाच्या बाई पाठमोऱ्या दिसल्या, की त्यांची अंग-काठी कोणती आणि खरी काठी कोणती हा नेहमीच संभ्रम पडे. तासभर मग भारतावरुन आणि भारतांतून (म्हणजे नक्की कोठून कोठे हे आमच्या आकलनाबाहेरचे होते) वहाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाऱ्यांचा पाढा वाचला जाई. त्यांत ईशान्य मोसमी वारे – नैऋत्य मोसमी वारे वगैरे दाही दिशांना मोकाट सुटलेले वारे असत. त्याचप्रमाणे ओले वारे, कोरडे वारे अशी पण नांवे मधून मधून पेरलेली असत. त्यांचे वर्णन करता करता आणि आमच्या डोक्यात ते वारे घुसवता घुसवता बाईंच्या घशाला कोरड पडून डोळयांच्या कडा ओलसर बनत, पण आमच्या थंड मेंदूपर्यंत पोहोचायला मात्र ते बेटे घाबरत ! बाईनी 'खारे वारे' म्हटले कीं मला नेहमीच 'एप्रिल फूल' करण्यासाठी कोणीतरी मिठाचे पाणी प्यायला दिल्यासारखे वाटे; व मतलई वाऱ्यांचा, मतलबीपणाशी काहीतरी घनिष्ठ संबंध असावा अशी शंका येई. खरी मजा येई ती हे वारे नकाशावर भरतांना ! रंगीबेरंगी बाणांचे आमच्या नकाशावर ठिकठिकाणी तुंबळ युध्द सुरू असे, आणि जीव वाचवण्यासाठी सारे जण सांपडेल त्या दिशेला सैरावैरा धांवत असत.

a


RAJASTHAN
UTTAR PRADESH
SIKKIM
BIHAR
GUJARAT
MADHYA PRADESH
JHARKHAND
WEST BENGAL
CHHATTISGARH
ORISSA
Daman & Diu
Dadra & Nagar Haveli
MAHARASHTRA
ANDHRA PRADESH
Pondicherry (Yanam)
Bay
Of
Arabian
KARNATAKA

बाणांचे तुंबळ युद्धं

a

ही झाली भूलंबांतील वाऱ्यांची कथा (पृथ्वी गोल नसून लंबाकृती आहे हे कोणातरी महाभागाने कोठेतरी सिध्द केलेले असतांना, जुन्या नांवाला चिकटण्याचां ह्यांचा (!) हा हट्ट कां कोणजाणे !)

संस्कृत किंवा मराठी काव्याचा तास सुरु झाला कीं, तर वाऱ्यांना अगदी ऊतच येई जणू कांही ! फुलांचा सुगंध पसरवणारे वारे काय, प्रियकराच्या भेटीला गेलेले काय, अंगाला (की प्रियेच्या अंगाशी) झोंबणारे वारे काय, आणि काय काय! बाळयाच्या प्रेमांत पडलेल्या किशीची मात्र – हे सारं वाऱ्यांचं काव्य आपल्यावरूनच घडतं आहे, अशी ठाम समजूत असे. ते सारं वाऱ्यांचं काव्य मिटक्या मारीत ऐकणारी किशी - नुकत्याच डुलकी लागू पहाणाऱ्या अस्मादिकांना कोपरखळी मारून जागे करी आणि विचारी ‘काय वाटतं गं तुला हे सारं ऐकतांना? ? आमच्या थंड डोक्यांतून मग गरम उत्तर येई - “गरमागरम कांद्यांची भजी खावीशी वाटतात”दुसरं काय?

शास्त्रांचे वारे तर म्हणे समोरासमोर असलेल्या खिडक्यांमधून वहात – (जे आम्हाला कधीच दिसले नाहीत) पण ऐकून मोठं कौतुक वाटे. शरीराच्या आकाराला साजेसं असणारं डोकं, मग उन्हाळ्यांत वेग मंदावणाऱ्या घडयाळाच्या लंबकाप्रमाणे एकशेऐंशी अंशाच्या कोनांतून फिरून येई. उजव्या खिडकीत दृष्टीस पडे ती ‘ब’ तुकडीच्या वर्गातून दांत विचकून हंसणारी नली आणि डाव्या खिडकीत दिसे तो घंटा बडवणारा विठ्ठल. आता वारे विठ्ठलाकडून नलीकडे सरळ वहातात कां नलीकडून विठ्ठलाच्या दिशेने वक्र रेषेत जातात हे आम्हाला कसं दिसणार? ते एक नली आणि विठ्ठलच जाणे!

a

शास्त्राच्या वर्गात आमचा प्रवेशही धुमकेतू-इतकाच दुर्मिळ असे म्हणा ! पण अशा वेळीही ‘वायुविजन’ एकदम थांबवून थांबे मास्तर एकाएकी पृच्छा करीत ‘काय आज इकडे कुठे वारे वाहू लागले आपले” ? आणि मग तासाला येण्याची केवढी घोडचूक केली हे मागाहून लक्षांत येई.

अशा या विषयांच्या वावटळीत सांपडत, एकेका वर्गाच्या भोवऱ्यांत अनेकदां अडकत आणि शाळेतल्या बाकी वाऱ्यांवर मात करीत करीत आमची ही शिक्षणनौका, वायुकृपेनेच का होईना अखेर शिक्षणाच्या किनाऱ्याला लागली. आता वाऱ्यांचा आणि आपला कांहीही संबंध नाही आणि त्यांचं पुन्हां नांवही काढायचं नाही असा त्याचवेळी मनाशी निश्चय करुन टाकला.

तरीपण !!! वारे वहाणे अजून संपुष्टांत आले नव्हतेच ! मध्यंतरीचा काळ ही वादळापूर्वीची शांतता ठरली. आणि .. एक दिवस आमच्या प्रेमप्रकरणाची “वार्ता” वाऱ्याबरोबर उडत उडत आमच्या बंधुराजांच्या कानांवर आदळली. झाले .. घरांत वावटळी उठू लागल्या; शब्दांची वादळे माजू लागली. (पेल्यांतल्या वादळांसारखी म्हटलं असतं, पण म्हणजे काय कोण जाणे !) अखेर आमच्या भावी वराच्या मात्यापित्यांकडून अनुकूल वारे वाहिले म्हणा किंवा वातायनांत बसून केलेली आमची तपश्चर्या फळाला आली म्हणा, आमचे दोनाचे चार हात होण्याचे अखेर ठरले. झाले ! बातमी वायुवेगाने पसरून कर्णोपकर्णी झाली सुध्दां!

a

पण आतापर्यंतच्या या साऱ्या वाऱ्यांवर मात केली ती आमच्या पतिराजांनी! विवाहसमारंभ पार पडण्याच्या आंतच हवामानखात्यातर्फे, वाऱ्यांवर संशोधन करण्याच्या उच्च शिक्षणासाठी त्यांची निवड करण्यांत आली; आणि लग्नानंतर ताबडतोबच निघावे लागणार असल्याने, ‘वाऱ्यावरची आमची ही वरात’ (खऱ्या अर्थाने ! लाक्षणिक नव्हे !) पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहू लागली.

आतां बोला ..... आतां काय म्हणाल तुम्ही ‘वाऱ्यांशी’ असलेल्या माझ्या या लाग्याबांध्यांना ?

# लेखांक ३

# निसर्गाची मनोहारी किमया

## पार्श्वभूमी

निसर्गरम्य ठिकाणांचं मला लहानपणापासूनच अत्यंतिक आकर्षण होतं. उंच उंच डोंगर, पाण्यानं ओसंडणारे तलाव, उंचावरून कोसळणारे धबधबे, घनदाट झाडी असलेली जंगलं आणि हिरवीगार शेतं, अशा सगळयाच गोष्टी भुरळ पाडीत.

ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट किंवा मोठमोठया गारांचा पाऊस, काळंकुट्ट झालेलं आकाश, अशा निसर्गाच्या चमत्कारांचंही एक अनामिक, भीतीदायक पण अदभूत आकर्षण वाटे. पौर्णिमेचं चांदणं किंवा टपोरा चंद्र बघितला की मन उगीचच सैरभैर होई. अंगाला झोंबणारा पहाटेचा गार गार वारा, हिरवळीवर जमून उन्हात हिऱ्यासारखे चमचमणारे दंवबिंदू, पावसाळ्यात अचानक दर्शन देणारं इंद्रधनुष्य,अशा निसर्गाच्या सगळयाच चमत्कृती वारंवार अनुभवाव्यात असं आवर्जून वाटे.

ते निसर्गप्रेम आणि आवड, परदेशी रहायला गेल्यावर तर खूपच वाढली. इंग्लंडसारखा देश म्हणजे खऱ्या अर्थी निसर्गसौंदर्याची लयलूटच. शहरापासून मैल दोन मैल दूर गेलं, की निसर्गसान्निध्य सुरूच. त्यातूनही, प्रत्येक ऋतूमानाचं सौंदर्य वेगळंच. कधी हिरवीगार शेतं, कधी मोहरीच्या पिवळया जर्द फुलांनी डंवरलेली पिवळी शेतं, रंगीबेरंगी रानफुलांचे ताटवे आणि हिरव्या लाल वृक्षवेली. त्यामुळे बघणाऱ्याचं मन हरखून गेलं नाही तरच नवल. निसर्गाची विविधरंगी रूपं आणि अदभुत किमया अनुभवतांना मनात नेहमीच असंख्य विचारांची दाटी होई – अशा बेचैनीमधूनच शब्दबद्ध झालेले काही अलौकिक अनुभव आणि विचार.



**मोहरीच्या पिवळ्या जर्द फुलांनी डंवरलेली पिवळी शेतं**



# रानफुलांचे ताटवे

a

# निसर्गाची मनोहारी किमया

बाहेर हिमवर्षाव सुरुं होतो आणि माझं मन आनंदानं कांठोकांठ भरून येतं. आकाशाचा धरणीशी चाललेला तो खेळ, माझ्या आवडत्या खिडकीत बसून मग मी तासन तास पहात रहाते.

आकाशांतून पांढऱ्याशुभ्र कणांची उधळण मुक्तहस्तानं चालूं असते. जणूकाय पृथ्वीला भेटायला निघालेली असंख्य आकाशबाळेच ! थोडयाच वेळात अवकाशांत त्यांचे आकार वाढू लागतात, त्याबरोबर वेगही वाढतो आणि मग खेळाला खरा रंग भरू लागतो. लपाछपी, छापापाणी करता करता गिरक्यांना सुरुवात होते. स्वतःभोवती गिरगिरतांना भिडूंना खो मिळूं लागतात........ आणि अखेर खेळ मंदावतो...... सारे भिडू हरतात, धरणीमातेचे पाय धरतात. पृथ्वी हंसते..... आकाशाला राग अनावर होतो ...... मग ......अधिक गुटगुटीत बाळांचा दुसरा थवा नव्या जोमानं पाठवला जातो...... नवे भिडू नवा राज ........आणि अखेर शरणागती !

आवर्तनांमागून आवर्तनं चालू असतात-संपत असतात आणि खेळाडू थकून भागून शरण जात असतात. अखेर तृप्तीचं आवरण पांघरून पृथ्वी त्याखाली दडून बसते. गगनाला विजयोन्माद चढतो.....त्यामुळे पुन्हां एकदां धांवपळ, पळापळ, गर्दी आणि मग सारं शान्त !

निसर्गाचा खेळ अखेर थांबतो. काय मजा असते त्या खेळांत ! मन धुंद बनून जातं. हिमाच्या त्या गिरक्यांबरोबर मनाची पण मोठमोठी आंदोलनं चालू

असतात. वाटतं .... उठावं .. नाचत बागडत बाहेर जावं ... ते पांढरेशुभ्र, मऊ मुलायम कण अंगावर झेलावेत. आपलं वय विसरून त्या हिमबाळांबरोबर हवेत खूपखूप गिरक्या माराव्यांत आणि मग थकलेल्या मनानं आणि शरीरानं त्या रुपेरी मऊ मऊ गालिच्यावर मनसोक्त लोळावं. पण ! समाजाच्या आणि खोटया प्रतिष्ठेच्या बंधनांनी जखडल्या गेलेल्या मला, त्यापैकी काहीच करता येत नाही. नुसतंच मग मी डोळ्यांनी त्या सौंदर्याचं आकंठ पान करते आणि मनःपटलावर कल्पनाचित्रे रेखाटते.



**हिमवर्षावानंतरची काही विलोभनीय दृश्ये**

अशाच एका सकाळी दिवसाच्या लवकर लागलेल्या चाहूलीनं मला जाग येते. इतर वेळी लपत छपत आंत शिरणारे प्रकाशकिरण आज भल्या पहाटेच माझ्या पांघरुणाशी चाळा करायला लागतात. नाईलाजानं आळोखे पिळोखे देत मी उठते आणि संवयीप्रमाणे पडदा बाजूला सारते. मात्र ..... बाहेरचं दृष्य पहाताच नेत्र विस्फारित होतात .... नजर खिळून रहाते. काय असतं त्या दृष्यांत ? रात्रीच्या काळोखांत पृथ्वीवरुन कोणीतरी जादूची कांडी फिरवून तिचं जादूनगरीत रूपान्तर केलेलं असतं. त्या नगरीमधली वस्तून वस्तू पांढऱ्या शुभ्र आवरणाखाली दडून बसलेली असते. जणूकाय चंदेरी रंगात बुडवून बाहेर काढलेली रुपेरी दुनियाच ! त्या धवलनगरीमधली सगळी घरं, रस्ते आणि हिरवळ सुध्दां पांढऱ्या शुभ्र वस्त्राखाली शान्तपणे विश्रांती घेत असतात. वृक्षांचे शेंडे आपले चमचमणारे साज संभाळीत उभे असतात. त्या सौंदर्याची जादू काही औरच असते. वाटतं .....त्या जादूनगरीची राजकन्या बनावं. आपल्या इवल्या इवल्या पंखांनी खूप भराऱ्या माराव्यांत. हलकी हलकी पावलं टाकीत – त्या पांढऱ्या शुभ्र वस्त्राला धक्काही न लावता मनसोक्त हिंडावं...पण ! पण !! प्रत्यक्षात तसं काहीच घडत नाही.



हिमनगरीकडे बघतांना मी



a

अंगावर आलेला एक नाजुक कवडसा माझ्या या गोड गोड स्वप्नांचा भंग करतो. आपल्या प्रखर आणि प्रभावी हस्तांनी रविराज, पृथ्वीनं पांघरलेल्या त्या हिमवस्त्राची चिरफाड करीत असतो. रात्रीच्या खेळानंतर, आकाशानं धरणीला बहाल केलेल्या त्या सुंदर वस्त्राचे अवशेष जणू आपल्या सहस्त्र करांनी नष्ट करू पहात असतो. त्या "वस्त्रहरणानं" केविलवाण्या बनलेल्या धरेची- लज्जारक्षणाची शेवटली धडपड चालू असते. अखेर....कणाकणांतून निराशेचे अश्रू ओघळू लागतात.

पृथ्वीची अशी दारूण विटंबना बघण्याची माझी इच्छा नसल्यानं, मी डोळे गच्च मिटून खिडकीपासून विष्पण्ण मनानं दूर सरकते. पण पडदा उघडताच डोळे दिपवून टाकणाऱ्या पांढऱ्या जादूनगरीनं मात्र माझ्या हृदयांत कायमचं घर केलेलं असतं !

कॅलेंडरच्या उडणाऱ्या पानांबरोबर आणि चोरपावलांनी सरकणाऱ्या दिवसांबरोबर निसर्गाची अशी कितीतरी रूपं आणि खेळ मी पहात असते.

शिशिराची चाहूल लागताच, थकल्या भागल्या शरीरानं आपल्या साजशृंगाराचा पालापाचोळा करुन फेकून देणारे आणि नंतर त्या शृंगारहीन कायेची लाज वाटून, वसंतागमनाकडे डोळे लावून बसलेले कितीतरी वृक्ष मी पाहिले आहेत. शिशिराच्या शापाबरोबरच, वसंताच्या आगमनाचा उश्याप मिळवला आहे या बेटयांनी म्हणून बरं ! नाहीतर ...... त्यानंतर, नवलेण्यांनी पुलकित झालेली त्या वृक्षांची कोमल काया पाहिली, की अगदी हेवा करावासा वाटतो त्या वृक्षपल्लवांचा!

a



चार ऋतूंमधली निसर्गाची मनमोहक रुपे

a

आकाशात शेकडो रंगांची उधळण करणारा सूर्योदय आणि सूर्यास्त असेच मला प्रिय वाटतात. एकच सूर्य पण दिवसभराच्या आपल्या प्रवासांत किती भावनांचं दर्शन घडवतो. उगवतीच्या सूर्याकडे पहातांना जो उत्साह, जे मांगल्य, जी प्रसन्नता वाटते, ती कलणाऱ्या दिवसाबरोबर अधिकाधिक तीव्र होत जाते की काय कोणजाणे. मावळतीच्या सूर्याचं आणि सौम्य होत जाणाऱ्या पश्चिमेच्या किरणांचं सौंदर्य तरी कमी थोडंच असतं? पावसांत भिजून कधीनवत बाहेर येणाऱ्या इंद्रधनुष्याच्या रंगांची जादू तरी कोणत्या शब्दात वर्णन करणार ?

आकाश काळयाकुट्ट ढगांनी भरुन आलं की माझ्या हृदयाकाशांत पण नेहमीच विचारमेघांची गर्दी जमते. रुद्रावतार धारण करुन विद्युल्लतांनी आणि घनगर्जनांनी भयभीत करणारा मेघराज जितका मला प्रिय वाटतो, तितकाच पावसाच्या झिमझिमत्या सरी ओघळणारा वरुणराजही मोहिनी घालतो. चंद्राचं शीतल चांदणं बेचैनी आणि हुरहूर वाढवतं, तर काळोख्या रात्री चमचमणाऱ्या ताऱ्यांची मजा पहाताना मी साऱ्या विश्वाचा संचार करून येते. सागराला येणाऱ्या भरती-ओहोटीच्या फेंसाळणाऱ्या लाटांनी जितकं मन उचंबळून येतं, तितकंच निसर्गसुंदर अशा स्वच्छ आणि शुध्द जलाशयाकडे पाहून शान्त बनतं.



फेंसाळणाऱ्या लाटांशी हितगूज

a

निसर्गाची ही आणि अशी विविध रुपं पाहिली की मन हुरहुरतं, हलकं फुलकं बनतं, प्रत्येका प्रसंगाचा, दृष्याचा अर्थ उलगडून पहावासा वाटू लागतो. ते क्षण पुनःपुन्हा जगावेसे वाटायला लागतात. पण ते कधीच शक्य नसतं. कारण हातातून निसटलेले क्षण परत येण्यासाठी थोडेच असतात?

मग वाटतं बस्स ! हातांत कुंचला घ्यावा आणि ही सारी दृष्यं, हे सारे प्रसंग असेच्या असे कॅनव्हासवर चितारावेत. पण ! माझ्या रंगपेटीत असलेला एकही रंग माझ्या मनास उतरत नाही. काय रंगवायचं असतं मला ? हिमनगरी..... त्यासाठी लागणारा पांढरा रंग माझ्याजवळ नसतोच। कारण त्यांत सूर्याचं तेज, चंद्राची शीतलता, पावसाचा ओलावा, आकाशाची मुलायमता – सारं सारं उतरायला हवं असतं मला ! आकाशाचे क्षणोक्षणी बदलणारे रंग, उगवत्या सूर्याचा नेत्र दिपवणारा प्रकाश, दवाबिंदूमधली चमक, आकाशांतून कोसळणारी हिमबाळं – प्रत्येका रंगाला माझ्या दृष्टीनं अर्थ असायला हवा असतो. आकारातून भावना प्रकट व्हायला हव्या असतात आणि कलाकृती सजीव देखणी बनायला हवी असते. पण दुर्दैवानं ते सामर्थ्य माझ्या कुंचल्यांत नसतं. फक्त मनांत खूप काहीतरी असतं.

मग वाटतं . . . निदान सप्तसुरांमधून तरी निसर्गाबद्दलच्या या भावना व्यक्त करण्याचं सामर्थ्य माझ्यांत यावं. निरनिराळ्या वाद्यांच्या तारा छेडाव्यांत, तबल्याचा ठेका लावावा आणि स्वरांमधे पुरेपुर माधुर्य ओतून– मनाचे बंध खुले करुन, सूर आणि भावना यांचा मुक्त आविष्कार करावा . . पण तसंही

a

कांही घडत नाही. अधिक ताणल्या गेलेल्या मनाच्या तारा तुटतात मात्र ! पण स्वर आतल्या आंतच विरतात आणि भावना अखेर अव्यक्तच रहातात.

रंगसंगती आणि सूरसंगतीशी शरणांगती पत्करल्यावर मग कवि बनावसं वाटायला लागतं. खूप खूप काहीतरी लिहिण्याची इच्छा होते; शब्दांमधे प्राण ओतावेसे वाटतात. जे जे आजपर्यंत पाहिलं, मनात साठवलं आणि अनुभवलं ते काव्याच्या बळावर सजीव-साकार बनवावंसं वाटतं. पण ! तेही अखेर न जमणारंच असतं, कारण कवीची आणि माझी जात एक नसतेच.

मला जे वाटतं ते मी इतरांना दाखवू शकत नाही, समजाऊन देऊ शकत नाही आणि माझ्यासारखंच इतरांना वाटतं कीं नाही हे जाणूनही घेऊ शकत नाही.

निसर्गाच्या सान्निध्यात – खऱ्या कलावंताच्या मनांत उसळणाऱ्या भावना मी समजू शकत असते, तसंच संगीतकाराचं हेलावणारं मनही. कोमल कविहृदयांत उठणारे नाजुक तरंग देखील मला जाणवतात- त्यामुळे यापैकीं कांहीही करता आलं नाही – साध्य झालं नाही तरी आता मी असमाधानी मात्र नसते. कारण या सर्वांचा आनंद देणारं, अधिक समाधानी बनवणारं, असं मौल्यवान कांहीतरी मला नव्यानं गवसलेलं असतं –

ते म्हणजे: निसर्गसौंदयातील काव्य, संगीताची माधुरी, आणि उत्तम चित्रकृती या सर्वांचा एकत्र आस्वाद घेता येईल, असं: **विशाल रसिक मन** !

# लेखांक ४

# फुलांच्या भाषा आणि भावना

## पार्श्वभूमी

मला वाटतं ‘फुलं’ न आवडणाऱ्या व्यक्ती जगाच्या पाठीवर विरळाच सापडतील. रंग गंध, सुगंध आणि सौंदर्य या सगळ्या विशेषणांच्या परिसीमा, विविध फुलांमधे आढळतात. शोधायला गेलं तर फुलांमधे फार मोठं तत्वज्ञानही दडलेलं आहे. आयुष्याचा आनंद भरभरून लुटण्याचं तत्त्वज्ञान, सकारात्मक दृष्टीकोन ठेवून जगाकडे आकांक्षांनी बघण्याची उमेद, मनःशांती, समाधान मिळवून देण्याची ताकद. आणि आणखीही कितीतरी.

पाश्चिमात्य लोकांनी त्यादृष्टीनं फुलांच्या विविध जातींवर बरंच संशोधन करुन, प्रत्येक फुलाची भाषा आणि त्यांच्यामधली भुरळ घालणारी अद्वितीय जादू यांचं विश्लेषण केलं आहे. म्हणून तर निरनिराळ्या प्रकारच्या भावना व्यक्त करण्यासाठी, प्रत्येक प्रसंगानुरूप (लग्नसमारंभापासून अन्त्ययात्रेपर्यंत) विशिष्ट प्रकारच्या फुलांचे गुच्छ देण्याची प्रथा, पश्चिमी देशांमधे दृढ झालेली आहे.

a

फुलांच्या अंतरंगाबद्दल मी जे थोडंसं जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे, त्यानुसार प्रत्येक देशामधली विशिष्ट फुलं ही खरोखरीच तिथल्या लोकांच्या मनाची आणि संस्कृतीची प्रतिबिंबं असावीत. म्हणूनच इंग्लंडच्या वास्तव्यात, तिथली अप्रतिम सौंदर्यानं नटलेली फुलं पाहतांनाही मला नेहमी विलायती फुलं आणि भारतीय फुलं यांचा तुलनात्मक दृष्टीकोनातून विचार करावासा वाटे. त्यातूनच साकारलेल्या आणि प्रत्यक्ष अनुभवलेल्या भारतीय फुलांच्या काही सुखद आठवणी.

## फुलांच्या भाषा आणि भावना

फुलदाणीत आकर्षक रचनेनं मांडून ठेवलेली क्रिसॅन्थोममची फुलं वाऱ्याच्या झुळुकेबरोबर हलत होती आणि त्यांचा मंद सुगंध, पिवळ्या शेवंतीची आठवण करून देत होता. इंग्लंडच्या वास्तव्यांत, वेगवेगळ्या ऋतूंमधे फुलणाऱ्या रंगीबेरंगी फुलांची उधळण पाहिली, की क्षणभर खरोखरीच भान हरखून जातं. विशेषतः उन्हाळ्यांत प्रत्येकाच्या दारापुढे फुललेले रंगीबेरंगी फुलांचे ताटवे पाहिले, की अनेक रंग मिसळून खेळलेल्या रंगपंचमीची आठवण झाल्यावाचून रहात नाही. फुलांच्या तरी किती तऱ्हा, किती आकार आणि किती प्रकार !



**इंग्लंडमध्ल्या रंगीबेरंगी फुलांच्या ताट्व्यांसमवेत मी**

शेकडो रंगांचे गुलाब, टयूलिप्सच्या रेशमासारख्या मऊमऊ अर्धोन्मिलीत टपोऱ्या कळया, तांबड्या-पांढऱ्या-पिवळया-केशरी-जांभळया रंगांचे ग्लाडिओलायचे उंच उंच तुरे, भरगच्च पाकळयांची दाटीवाटीनं मांडणी केलेले डौलदार डेलियाज्, पिवळया जर्द रंगाची भुरळ पाडणारे नाजुक डॅफोडिल्स.... आणखी कितीतरी ! त्या फुलांना पाहिलं की दृष्टी खिळून रहाते, मन प्रसन्न बनतं आणि रंगांचं खूप आकर्षणही वाटतं.

a



# आकर्षक विलायती फुलं

a

पण ! लगेच मनात विचार येतो की त्यांचा मनावर कायमचा ठसा का उमटत नाही? सौंदर्याची खरी सार्थकता क्षणिक सुखापुरती, समाधानापुरती मर्यादित थोडीच आहे ? चिरकाल अन्तःकरणांत जे टिकेल तेच खरं सौंदर्य नव्हे का ? वाटतं – ही फुलं इतकी सुंदर असूनही मनाची पुरेशी पकड कां घेत नाहीत? वारंवार मला त्यांची आठवण कां होत नाही ? त्यांचं सौंदर्य माझ्या अन्तःकरणांत खोलपर्यंत जाऊन पोहोचतच नाही का? इथल्या लोकांच्या स्वभावाचं या फुलांशी साधर्म्य असेल कीं काय ? जवळ असलं की खूप प्रभाव पाडायचा आणि दूर गेलं की पार पार विसरुन जायचं. अशा एक – ना अनेक प्रश्नांची मनांत गर्दी होते, दृष्टी तुलनात्मक बनते, पूर्वस्मृती जागृत होतात आणि हळूंहळूं विचारवलयं मोठी मोठी बनून उत्तरं सापडायला लागतात.

भारतातली म्हणजे आपल्या देशातली फुलं मी नुसती पाहिलेली नाहीत, तर अनुभवलेली आहेत. मनाच्या खोल खोल कप्प्यांत त्यांच्या स्मृती सांठवून ठेवल्या आहेत. ती साधी आहेत – कदाचित त्यांना पुरेसे आकर्षक रंगही नाहीत – पण त्यांचा सुगंध अजून नाकांत दरवळतो आहे, रुपं डोळ्यांत आहेत, कोमल स्पर्श हातांना जाणवतो आहे आणि आठवणी मनांत घोळत आहेत. विलायती फुलांकडे पाहिलं की – रंगीबेरंगी झुळझुळीत कपडयांनी नटून सजून आणि अंगावर दागदागिन्यांचा श्रृंगार चढवून, उत्सवांत मिरवणाऱ्या कृत्रिम माणसांची – आठवण होते. आणि भारतीय फुलं ? स्वतःचं आयुष्य दुसऱ्यासाठी खर्ची घालणाऱ्या किंवा – स्वतः साधेपणानं राहून

a

जगासाठी जीवनसर्वस्व अर्पण करणाऱ्या साधूसंतांचीच उपमा द्यायला हवी त्यांना !



**भारतीय फुलं (१)**

a

भारतीय फुलांच्या नुसत्या आठवणींनी देखील मन अनेक वर्षं भूतकाळांत जातं, स्मृतींच्या पाकळ्या उमलून एकएक फूल आपली आठवण ताजी बनवून त्यांचा सुगंध पसरवतं. कशाकशानं बुजायच्या नाहीत त्या आठवणी ! विचारांचं खतपाणी मिळालं नाही तर आठवणींची ती फुलझाडं थोडीशी खुरटी बनतील कदाचित, पण शेवटपर्येंत तग धरतील !

विलायतेमधल्या विविध रंगी गुलाबांच्या ताटव्यांमधूनही माझ्या मनांत घर करुन बसला आहे तो – पावसानं नाहून निघालेला, पांकळी पांकळीतून निथळत असलेला, कांटेरीच, पण सुगंधानं धुंद बनवणारा - मऊ मुलायम स्पर्शाचा गुलाबी गुलाब ! रोज सकाळी जाग आली की ........ आज गुलाबावर किती फुलं असतील बरं ... हा विचार मनांत येई. फुललेल्या फुलांच्या गळणाऱ्या पांकळ्या झेलून, लहानपणी आम्ही त्या खायचो – जणू त्यांचं सौंदर्य कायमचं शरीरांत सांठवून ठेवण्यासाठी. दोन तीन हिरव्यागार पानांमधून अर्धवट डोकावणारी कळी केसात अडकवतांना, काय अभिमान आणि धन्यता वाटायची ... आमच्या गुलाबावरचं फूल !



**गुलाबी गुलाब**

खूप खूप फुलं निघायला लागली, की त्यांच्या त्या मखमली पांकळ्या कापून आम्ही बाटलीत भरुन ठेवायचो. कधी कधी वाटायचं, त्यांत क्रूरता

होती, व्यवहार होता-पण अखेर फुलांचं जीवन सार्थकी लावण्याचाच व्यवहार नव्हता कां तो ?

सुंदरतेच्या साऱ्या कल्पनांचं वरदान मिळालेला गुलाब वगळला तरी बाकी भारतीय फुलांचं सौंदर्यदेखील कांही कमी नाही.

पहाटेच्या प्रसन्न वेळेला पारिजातकाच्या नाजुक फुलांचा सडा पाहिला, की अंगावर रोमांच उभे रहाणार नाहीत असा मराठी माणूस विरळाच ! आपल्या केशरी देठांवर उभारलेला पांढऱ्याशुभ्र पाकळ्यांचा पिसारा काय शोभून दिसतो या फुलांना ! वाटतं ... ही नाजूकता, कोमलता अशीच कायम टिकून रहावी – ही पहाट कधीच संपू नये – सूर्यकिरणांचं या फुलांना कधी दर्शनच घडू नये. पण ! पण !! झाडाखाली विखुरलेली ती सारी नाजुक फुलं हातांनी टिपून घेण्यांत तासन तास घालवीत असे मी. वृक्ष हलवून-त्यावरून टपकणारी फुलं म्हणजे मोत्याच्या सरांमधून ओघळणारे मोतीच वाटत. स्वर्गात होणाऱ्या पुष्पवृष्टीची कल्पना-पारिजातकाच्या या वर्षावावरूनच कोणा कवीला सुचली असल्यास नवल नाही. देवावर ‘लक्ष’ वहाण्यासाठी हजारोंनी गोळा केलेली ही नाजुक फुलं, बोटांच्या टोकांवर केशरी रंग आणल्याशिवाय रहात नसत.

राममंदिराच्या दारी असलेलं बकुळीचं झाड असंच मला वेडंपिसं बनवी. चिमटीनं सहज उचलली जाणारी ती इवली इवली फुलं गोळा करुन त्यांच्या माळा गुंफायच्या. पण त्या स्वतःच्या केसांत न माळता दुसऱ्यांच्या केशरचना सुशोभित करायच्या, हा माझा एकेकाळचा अतिशय आवडता छंद

a

होता. आपल्या अपुऱ्या सौंदर्याची उणीव, मधुर सुगंधानं भरुन काढणारी बकुळ ! जीवन सार्थकी लागल्यानंतर सुकेल पण सुगंध सोडणार नाही !

जाईजुईच्या मांडवावर भरदुपारी आपले डोळे गच्च गच्च मिटून बसलेल्या असंख्य कळया बघितल्या की – जगाकडे एकदा तरी या डोळे भरून पहाणार आहेत की नाही असा संभ्रम पडे. मग हळूंहळूं उन्हं कलायला लागत आणि संध्येची चाहूल लागताच तिचं सौंदर्य न्याहाळण्यासाठी आणि तिच्या स्पर्शाच्या लालसेनं मांडवावरच्या या कळया, आपले मिटलेले डोळे हळूच किलकिले करू लागत. मऽग संध्येचा प्रकाश अंगावर झेलला रे झेलला की ही अर्धोन्मीलित नेत्रं खाडकन उघडत. हळूहळू विकसित होणारं ते पांढरं सौंदर्य, नजर धुंद बनवी. वाटे – या कळया अशाच अर्धविकसित रहाव्यांत, त्यांची सारी मादकता नेत्रांनी पिऊन टाकावी आणि हृदयांत कुठंतरी खोलखोल दडवून ठेवावी. पण ही सारी अधीरता – हा आभास – लवकरच तोकडा वाटायला लागे. कारण पूर्ण विकसित झालेल्या फुलांचं सौंदर्य आणि मादकता त्यापेक्षा तसुभरही कमी नसे. दुपारच्या प्रहरी बनवलेला जाईजुईचा किंवा कुंदकळयांचा गजरा, कलत्या उन्हाबरोबर उमलायला लागला, की त्याचेकडे पहातांना जो काही आनंद होई आणि औत्सुक्य वाटे ते शब्दांत वर्णन करण म्हणजे त्या फुलांचं सौंदर्य नष्ट करण्यासारखंच आहे.

a



# भारतीय फुलं (२)

a

माझ्या मनावर विविध भावनांचे तरंग उठवणारी ही सारी फुलं ! हिरव्यागार – लठ्ठ लठ्ठ पानांच्या गर्दीतून स्वतःचं अस्थित्व प्रकट करायला धडपडणारी बटमोगऱ्याची फुलं ! त्यांचा सुगंध आणि सौंदर्य तरी कोणत्या शब्दांत व्यक्त करणार ? पावसाळयाच्या ओल्या सकाळी परडीभर मोगऱ्याची फुलं तोडतांना पानांवर सांठलेल्या पाण्याचे जे नाजुक तुषार अंगावर उडत त्यांत कायमचं भिजत रहावंसं वाटे. तसंच मोगरीच्या कळयांचे आणि फुलांचे मोठमोठे हार बनवतांना, ओल्या देठांचा सुईवर जो टच टच आवाज होई, तो अजून कानांत घुमत असल्यासारखा वाटतो.

शाळेंत जातांना जोगळेकरांच्या घरासमोरील, फुलांनी लगडलेला सोनचाफा तरी कसा मनाआड करणार? त्या पिवळया धमक फुलांवर आशाळभूतपणे खिळून रहाणारी आमची नजर, अजून मला आठवते. मनाला नकळत गुदगुल्या करणाऱ्या सोनचाफ्याला पाहिल्याशिवाय किंवा अनुभवल्याशिवाय त्याचं सौंदर्य किती फिकं आहे !

रविवारच्या सहलीच्या दिवशी – नवग्रहांच्या मंदिरात जाताना, माझी पावलं प्रथम वळत ती तिथल्या कृष्णकमळीच्या वेलीकडे ! बघताक्षणीच पहाणाऱ्याची नजर घायाळ बनवणारी कृष्णकमळ ! काळयासावळयाच पण तरतरीत नाकाडोळयांच्या आणि रसरसलेल्या बांध्याच्या नवयुवतीच्या सौंदर्याचा नमुनाच जणू ! कृष्णकमळीला पहातांना आणि अनुभवतांना सतारीच्या गोड गोड सुरांचे तरंग उठत रहात मनावर.



## कृष्णकमळ

हिरव्यागार पदराखाली आपलं हिरवंच सौंदर्य झाकून ठेवण्याचा प्रयत्न करणारा तो हिरवा चाफा ! स्वतःला दडवू पहाणाऱ्या त्या चाफ्याला – बेफाम करणाऱ्या आपल्या सुगंधाचं भानच रहात नसावं बहुधा ! एखाद्या छानशा संध्याकाळी रणदिव्यांच्या मळयांत फिरायला गेलो, की माझी वाटचाल प्रथम हिरव्या चाफ्याकडेच असे. पानांशी बराच वेळ लपंडाव खेळल्यावर मग एखादं तरी फूल हाती लागेच. हुंगून हुंगून आणि मुठींमधे गच्च आवळून त्या

a


कणखर पांकळ्या देखील काळ्या पडू लागत पण मनाची तृप्ती होत नसे.... वाटत राही ... हा सुगंध चिरकाल असाच रहावा ... आणि मग त्या सुगंधाची वलयं स्वतःभोवती निर्माण करीत स्वतःलाच हरवून बसावं !



**चाफ्याची फुलं**

a

नवरात्राच्या सुमारास बाजारांत – कलाबतुंनी चमचमणाऱ्या पिवळयाजर्द आणि पांढऱ्या – गुलाबी शेवंतीच्या-जाडजूड पण आकर्षक वेण्या दिसू लागल्या, की दसरा-दिवाळी जवळ आल्याची चाहूल नकळतच लागे. गावांत होणारा एकही समारंभ मग, शेवंतीच्या फुलांनी गुंफलेल्या हारतुऱ्यांशिवाय पार पडत नसे. दसऱ्याचा दिवस उजाडला की तर रस्त्यावर शेवंतीच्या गजऱ्यांव्यतिरिक्त दिसणारी स्त्री विरळाच ! लहान मुलींपासून तो थेट प्रौढ स्त्रियांपर्यंत - सगळयाजणींच्या तऱ्हेतऱ्हेच्या केशरचना या वेण्यांनी सुशोभित झालेल्या असत. इथं त्याच जातीत गणल्या जाणाऱ्या क्रिसॅन्थोममची अधिक सुंदर, टिकाऊ आणि मोठ-मोठी फुलं पहायला मिळतात पण पूर्वीसारखं मन भारावून जात नाही किंवा हेलावतही नाही.



## शेवंतीची फुलं

गणपतीच्या सुमारास घरोघर दिसणाऱ्या केवडयाच्या कणसांमधेही कांही वेगळीच जादू आहे. पानापानांतून ओतपोत भरलेली ती मादकता ! जिथे नागांसारख्या भयंकर प्राण्यांनाही ती केतकी आपल्या सुगंधाच्या मोहिनीवर झुलत ठेवते तिथे मुळांतच सौंदर्यप्रेमी असणाऱ्या मनुष्यप्राण्याची काय कथा ? केवडयाच्या पानांचा बनवलेला पंखा, गणपतीच्या मूर्तीमागे काय शोभून दिसायचा आणि वातावरण पण कसं मंगल आणि प्रसन्न बनायचं. तीच गत हरतालिका आणि मंगळागौरीच्या वेळी कलात्मकतेने मांडलेल्या केतकीपर्णांची ! केतकीवर्णावरुन कनकांगीची उपमा किती रास्त वाटते !

a

रात्रीच्या निवांत वेळी अंगणात बसून - गुलछडी आणि रातराणीच्या सुगंधानं धुंद आणि उत्कट बनून – त्यांच्या सहवासांत आम्ही आयुष्याच्या कित्येक घटका घालवल्या आहेत.

सौंदर्य अगर सुवासाचं वरदान असलेली ही फुलं सोडली तरी बाकी फुलांवरचंही माझं प्रेम आणि आकर्षण कमी नाही.

रात्रीच्या काळोखावर मात करून, आपल्या श्वेत – शुभ्र रंगानं जगाला दिपवून टाकणारी पांढरी चटकचांदणी ! ना धड रंग ना वास, पण नृत्य-नाटकांसाठी केलेले चटकचांदणीचे भरघोस गजरे, किती शोभा वाढवीत त्या साध्या कार्यक्रमांची !

आपल्या जीवनाला कंटाळून, उतरत्या उन्हाबरोबर जीवितपुष्पे अर्पण करणारी ती काटेकोरांटी ! कसा काढून टाकू तो मोहक रंग तरी मनांतून ? स्वतः अबोल राहून प्रेमिकांना बोलकं करणारी ती अबोली !

उंच आणि ताठ माना ठेवणाऱ्या आईवडिलांच्या अंगाखांद्यावर अभिमानानं खेळणारी ती पांढऱ्या आणि तांबडया चाफ्याची फुलं ! लहानपणी त्यांच्या अंगठ्या बनवून त्या आम्ही दोन्ही बोटांमध्ये घालीत असू. हिरव्या पिवळ्या तृणांकुरांमधून लाजत लाजत मुखकमल दाखवणारी ती लिली !

सूर्याच्या कलाप्रमाणे आपली दिशा बदलणारी मोठ्या डोक्यांची सुर्यफुलं ! उंच वाढणाऱ्या शेतांत मधेच फुलून आपलं अस्थित्व प्रकट करणारा धोतरा ! पिवळ्या धमक, नाजुक नाजुक परागपुष्पांनी ओथंबून येणारी बाभूळ ! साऱ्या कोमलतेचा अर्क काढून बनवलेली ती शिरीशाची फुलं ! आपल्या

लालभडक गेंदेदार फुलांनी डोळे दिपवून टाकणारी जास्वंद ! घरांच्या आणि वृक्षांच्या आधारानं वाढून साऱ्यांना गारवा देणारी गारवेल! दारांत कधीही फुलायला न चुकलेली सदाफुली ! आपल्या सेवेत कशाचीही उणीव न भासू देणारी गुलबाक्षी ! आणि जगाकडून अव्हेर तर होणार नाही ना, ही धाकधूक मनांत बाळगीत जन्माला आलेली ती कण्हेर !

निळया आकाशाच्या पार्श्वभूमीवर आपल्या लालचुटुक रंगानं वसंतागमनाचं चित्र रेखाटणारा तो गुलमोहर – आणि त्याच्याच खांद्याला खांदा लावून – ओथंबणाऱ्या पुष्पसंभाराला आपल्या मायेच्या पंखाखाली सांभाळणारं ते बुचाचं झाड ! किती धांवायचो आम्ही ती बुचाची फुलं वेचण्यासाठी ! मग ती लांब लांब देठांची, सुईदोऱ्याविना गुंफली जाणारी फुलं, दुहेरी-तिहेरी वेण्यांचं रुप धारण करीत. वाळलेली फुलं पाण्यांत टाकून पुन्हां ताजीतवानी बनवतांना तर संजीवनी सांपडल्याचा आनंद होई आमच्या बालमनाला !

# भारतीय फुलं (३)



एक ना अनेक ! किती रंग, किती सुगंध, किती रुपं आणि त्यामागील किती आठवणी ! प्रत्येक फुलाला माझ्या मते बाह्यांगाबरोबर अंतरंग आहे आणि ते अंतरंगच मला मनांत सांठवायचं आहे. अगदी शेवटपर्यंत ….अन्तापर्यंत.

प्रत्येक फुलामागे वेगळ्या व्यक्ती आणि वेगळे प्रसंग दडलेले आहेत. ते सारं आठवलं की वाटतं जुन्या आठवणी टिकवून धरण्याचं केवढं मोठं सामर्थ्य आहे या फुलांमधे. ही सारी भारतीय फुलं मला अत्यंत प्रिय आहेत

कारण त्यांचं गूढ हितगूज मला समजतं. त्यांच्यात मी वावरले, त्यांच्याबरोबरच मोठी झाले, म्हणून मला वाटतं ती माझी आहेत. सौंदर्याची वस्तू सर्वांसाठी एकच असली, तरी त्यापासून मिळणारा आनंद आणि अनुभव हा प्रत्येकापुरताच मर्यादित नसतो कां ?

**भारतीय फुलं (४)**



या फुलांचा अनुभव आणि आनंद मला विलायती फुलांमधे कां गवसत नाही? कारण ... कारण ... कितीही झालं तरी **परक्याचं धन ते** !

# लेखांक ५

# फिरुन फिरुन सय येते – जीव वेडावतो

## पार्श्वभूमी

इंग्लंडच्या वास्तव्यामधला आरंभीचा काळ होता तो (साधारण १९६४ च्या आसपासचा). शिक्षण आणि पार्ट टाईम नोकरी चालू होती. मिळकत बेताचीच. रहायला लहानसं भाडयाचं घरकुल. दिवसभर घर गरम ठेवणं सुध्दा फारसं परवडण्यासारखं नसे. हिवाळा सुरु झाला की बाहेर कडाक्याची थंडी – अगदी हाडांपर्यंत जाऊन भिडणारी. त्यांत कधी बर्फ, कधी सोसाटयाचे वारे तर कधी दिवसभर पावसाची रिपरिप. तीन वाजताच बाहेर अंधाराचं साम्राज्य पसरे. त्यामुळे सगळया वातावरणावरच एकप्रकारची उदासीनता येई.

गावात जेमतेम दहाबारा मराठी लोक. ते देखील प्रत्येक जण आपापल्या अभ्यासात, कामात नाहीतर नोकरीत व्यस्त. त्यामुळे भेटीगाठींसाठी फुरसतीचे क्षण, प्रत्येकाजवळ बेताचेच असत. त्यातून सगळी घरकामं, स्वयंपाक, बाजार प्रत्येकाला आपला-आपलाच करावा लागत असल्यामुळे मनावर एकप्रकारचं दडपण येई.

a

आमच्याजवळ तर स्वतःचा फोन नव्हताच, पण भारतातही कुणा नातेवाईकांकडे फोनची सुविधा नव्हती. त्यामुळे बाहेर जाऊन इतर लोकांकडेच नातेवाईकांना फोन घ्यावा लागे. कधी काही निमित्तानं फोनवर बोलण्याचा प्रसंग आलाच तर अर्धे पैसे आणि वेळ एकमेकांच्या रडण्यातच वाया जाई. त्यामुळे पत्रांनी जो आणि जेवढा संपर्क साधला जाई तेवढाच. पत्रे पोहोचायला देखील दहा ते बारा दिवस लागत. तोपर्यंत नुसती पत्रोत्तराची वाट पहाणं आणि आठवणी काढणं येवढंच काय ते हाती असे. अशाच एखाद्या उदास संध्याकाळी मग मायदेशाची, आपल्या माणसांची अगदी तीव्रतेनं आठवण येत राही. मन सैरभैर होई. त्या बेचैन मनस्थितीत सुचलेलं हे एक गद्यकाव्य !

a

# फिरुन फिरुन सय येते – जीव वेडावतो

पावसात निथळणारा मोगरा-
दवांत भिजणारी जाई जुई-
दसऱ्याला फुलणारी शेवंती आणि
रात्रींना धुंदी आणणारी रातराणी.

पुष्पवृष्टी करणारा पारिजातक-
हरतालिकेला वाहिलेला केवडा-
वसंतात फुलून उतू जाणारा गुलमोहर-
आणि वाऱ्यांना ‘सुगंधी’ बनवणारा आंब्याचा मोहोर.
चमचमणाऱ्या चांदण्यांची चटकचांदणी-

**वर वर्णन केलेल्या फुलांच्या आठवणी**



भाजलेल्या ओल्या शेंगा-
हरभऱ्याच्या हिरव्या डहाळया-
बोरांच्या भारानं ओथंबणाऱ्या बोरी.
हिरव्या पानांतून डोकावणारे पिवळे पेरू-
रखरखीत उन्हांत दिलासा देणाऱ्या केळी -
मुळासकट खावासा वाटणारा ऊस -
पानापानांना लगडणारा आंबा आणि
तोंडाला पाणी सुटावं अशा कोवळया चिंचा.
ते काटेरी फणस -
शेकडो डोळयांनी जगाला पहाणारी सिताफळे -
तहानलेल्या जीवाला शांतता देणारी शहाळी -
आणि टपोरे अश्रू ढाळणारी जांभूळ.



# आठवणींमधे रेंगाळणारी फळं

a

ती चैत्रगौरीची आंब्याची डाळ आणि कैरीचं पन्ह -

गणपतीच्या आरत्या आणि खिरापत -

दसऱ्याचे सीमोल्लंघन -

पाडव्याची गुढयातोरणे -

होळीची पुरणपोळी.

ते मंगळागौरीचे खेळ -

आणि हरतालिकेचे जागरण -

कोजागिरीची बासुंदी -

आणि नवरात्राच्या प्रसन्न आरत्या.

श्रावणे सोमवारचा उपवास -

त्रिपुरी पौर्णिमेच्या दीपमाळा -

दिवाळीतील अप्रतिम रोषणाई -

ते आकाशदिवे, ते फटाके, त्या फुलबाज्या.

फराळाचे भरभरुन वहाणारे डबे -

कधी बारसे कधी डोहाळेजेवण -

लग्न-मौंजीचे सोहाळे आणि ते घरपण !

येणाऱ्या जाणाऱ्यांचं आदरातिथ्य -

एकमेकांकडे रहायला जाणं -

मोठया मंडळींचे आशिर्वाद आणि कौतुक -

आपलेपणाची – हक्काची भावना.

भाषा आपली धर्म आपला -

भरपूर वाचायला – भरपूर बोलायला -

ते सुरेल संगीत – ते भारावलेले क्षण -

नाटके आणि सिनेमे -

गाण्यांच्या मैफिली – ते कार्यक्रम -

गणपती उत्सव – शिवजयंती

आणि किती किती गोष्टी !

**परदेशी राहूनच का बरं यावी या सगळ्या आठवणींची बेचैनी ?**

वरील लेख लिहितांनाची मी



# लेखांक ६

# हा किनारा - तो किनारा

## पार्श्वभूमी

ग्रेट ब्रिटन हे पूर्ण बेटच असल्यामुळे, सगळ्याच बाजूंनी समुद्रानं वेढलेलं आहे. (नॉर्थ समुद्र, इंग्लिश चॅनल, अटलांटिक महासागर आणि आयरिश समुद्र). त्यामुळे किनाऱ्यांवर भरपूर गावं वसलेली आहेत, हे वेगळं सांगायला नकोच. त्यापैकी काही गावं, त्यांच्या भौगोलिक स्थानांमुळे किंवा इतरही अनेक कारणांमुळे जास्त नावारुपाला आलेली आहेत.

प्रस्तुत गद्य काव्यात (किंवा स्फुट लेखात म्हणूया हवं तर !) मी इंग्लंडच्या पश्चिम किनाऱ्यावर असणाऱ्या दोन गावांच्या सागर किनाऱ्यांची एकमेकांशी तुलना केली आहे. एका गावचा समुद्रकिनारा खूप स्वच्छ सुंदर, शांत पण अगदी कमी गजबजलेला असतो. (सेंट ॲन्स)

याउलट, तिथून केवळ दहाच मैलांवर असणाऱ्या ब्लॅकपूल या गावाचा किनारा म्हणजे पूर्ण विरोधाभास आहे. ब्रिटनमधल्या – समुद्रकिनाऱ्यांवर असणाऱ्या गावांपैकी करमणुकीच्या दुनियेचं (Amusement Parks) ते फार मोठं आणि अतिशय लोकप्रिय केन्द्र आहे. ब्रिटनच्या सगळ्या

a

कानाकोपऱ्यांमधून लोक तिथे एक दिवस आणि एक रात्र हिंडायला, मौजमजेत वेळ घालवायला, म्हणजे थोडक्यात, 'जीवाचं ब्लॅकपूल' करायला येतात म्हटलं तरी वावगं ठरु नये.

एकाच दिवशी या दोन्हीं किनाऱ्यांना भेट दिली तर त्यांचे विरोधाभास नजरेत भरल्याशिवाय रहात नाहीत. भिन्न भिन्न स्वभावाच्या व्यक्तींसारखेच काहीसे. काही लोक अंगी भरपूर गुण असूनही प्रसिध्दीपरांमुखच रहातात. तर काही लोकांना आपलं भपकेदार -मायावी जीवन जगासमोर मांडावसं वाटतं.

मानवी मनांचे आणि आवडी निवडींचे विरोधाभास दाखवण्यासाठीच हे शब्दकाव्य !

## हा किनारा - तो किनारा

दुपारी दोन वाजतांची वेळ
ऊन तापले आहे
दुरून **सेंट ॲन्स**चा किनारा दिसतो आहे.
काठाकडे येणारं पाणी -
सूर्याच्या प्रखर किरणांमधे चमचमतं आहे.
भरतीच्या लाटा पुढे पुढे सरकताहेत -
पायांना मऊमऊ लागणारी सोनेरी वाळू -
तिचा मखमली स्पर्श -

सुखद वाटणारी पावलांची गरमी.

रंगीबेरंगी कपड्यांच्या-पण तोकडया वेष्टनांमधे –
हिंडणाऱ्या आकर्षक गौरांगना !
गुबगुबीत लाललाल गालांची भरल्या अंगांची -
सोनेरी – भुरक्या मुलायम केसांची -
मुक्तपणे बागडणारी गोड बालकं आणि
सुटलेल्या अंगाचे – आखूड कपडयांचे
सुस्तावलेल्या शरीराचे ते गौरपुरुष !

देश वेगळे – तऱ्हा वेगळ्या
पण आनंद मात्र –
त्यांचे आमचेसाठी एकच !
भटकंतीचा – मोकळ्या श्वासांचा
आयुष्यातले काही आनंदाचे
क्षण लुटण्याचा !

धर्म वेगळा – भाषा वेगळी -
कल्पनाही काहीशा भिन्न -
पण मनुष्यस्वभाव येथून तेथून सारखाच.

a

मनाला विरंगुळा देण्याचा इरादाही तोच.

पाणी पुढे पुढे सरकते -
किरणांची चमचम वाढते -
मधेच गहिरे रंग पसरतात -
आणि डोळे दिपून जातात.
लाटांची उंची वाढते -
आकार वाढायला लागतो -
आणि बघणाऱ्यांची उत्सुकता ही उंचावते.
क्षितिजाच्या दुसऱ्या कडेशी -
वाकलेलं पाणी जवळ जवळ सरकतं.
जवळ – आणखी जवळ – अगदी जवळ
आणि मग – -
अन्तर संपूर्णपणे नाहीसं होतं.
लाटांवर तरंगणारी माणसं –
त्या पाण्याशी एकरुप होऊन जातात.

निसर्गाचा हा अखंड चालणारा खेळ –
युगानुयगं तसाच चालू आहे तो -
शिवाशिवीचा - न संपणारा डाव -


a

“कोण” कोणाच्या मागे लागतो तेच कळत नाही.
कधी धरती हरते तर कधी पाणी.
चंद्र सूर्य – हा सागरभरतीचा अवखळपणा
आळीपाळीनं, नित्यनेमानं बघत असतात.
पहाण्याचा कंटाळा आला की –
हळुच गायब होतात.
पाणी मात्र वहातच असतं -
खळखळाट, गर्जना चालू असतात.
त्याला कुणाची तमा नसते.
पुढे – मागे – मागे – पुढे – खेपा चालू असतात.
आणि तरीही कंटाळा नसतो -
थकवा नसतोच नसतो.
प्रत्येक लाटे गणिक - नवा उत्साह – नवा जोम !

दुपार संपते – मागे सरते -
उन्हे उतरतात-
पाणी माघार घ्यायला लागतं -
शिंपल्यांनी रिता किनारा चमचमतो.

a

# सेंट ॲन्सच्या किनाऱ्यावरील काही दृश्यं



श्वान आपल्या मालकांना ओढू लागतात.
शिंगरांवर बसलेली मुलं थकतात.
पक्षांचा किलबिलाट मंदावायला लागतो.
आणि पक्षी दूरच्या किनाऱ्याकडे वळतात.
पतंग उडवणाऱ्यांचा उत्साहही -
पतंगांबरोबरच खाली उतरतो.

सारे थकून भागून –
भिन्न भिन्न दिशांना पांगतात.
किनारा ओस पडायला लागतो -
माणसांची वर्दळ थंडावते.
वातावरणावर शांतता पसरते.
मागे हटणाऱ्या लाटांबरोबरच -
सारं कसं शांत शांत होतं.

निसर्गाचं स्वरुप बदलतं -
दाटणाऱ्या अंधारात फक्त –
क्षितीजच दिसायला लागतं.
आणि आतापर्यंत आक्रमकपणे -
उसळ्या मारणाऱ्या सागराचं रुपांतर –
एका दूरवर पसरलेल्या -
पाण्याच्या रेषेत होतं.



# सेंट ॲन्सचा ओसरलेला किनारा

a

किनाऱ्यापासून दूर सरकलेले लोक -
मग स्वत:च्या अधिक जिवंत जगाकडे वळतात.
आपापल्या उबदार घरटयांकडे -
किनारा ओस पडतो. पण --
ओसरलेला सागर मात्र, पुनश्च
उगवणाऱ्या नव्या दिवसाची आतुरतेनं
वाट पहात – दूर दूर जाऊन स्थिरावतो. कारण ---
उद्या पुन्हा नव्यानं उदयाला येणाऱ्या –
सूर्य-चंद्र चांदण्यांची –
प्रतीक्षा करायची असते ना त्याला !

सेंट ॲन्स पासून अवघ्या दहा मैलांवर असणाऱ्या -
**ब्लॅकपूल**च्या समुद्रकिनाऱ्यानं
आमची गाडी चालते.
समुद्र बराच जवळ आहे.
उंच बांधलेल्या बांधावर बसून –
आयुष्याच्या उतरणीकडे झुकलेले
काही बुजुर्ग, संवयीच्या नजरेनं, त्या
हलत्या लाटांकडे स्थिर दृष्टीनं बघत आहेत.
त्यांची नजर पैलतीरावर अधिक स्थिरावली असावी का?

a

दूरवर मात्र--

लवकरच सुरु होणाऱ्या दिव्यांच्या रोषणाईची
आणि झगमगाटांची पूर्वतयारी चालू आहे.
अंधार पडण्याची प्रतीक्षा करताहेत सारे-
अंधार झाला की खऱ्या अर्थी हा किनारा -
खडबडून जागा होईल.

चित्रविचित्र आकाराच्या मोठाल्या मूर्तींनी -
रस्त्यावरचे विजेचे खांब सुशोभित केलेले आहेत.
दैदिप्यमान प्रकाश टाकण्याची, उत्सुकतेनं वाट पाहताहेत.
लवकरच रंगीबेरंगी दिव्यांच्या -
हज्जारो डोळ्यांनी हे रस्ते जिवंत होतील.
आणि आपआपल्या गाडीत बसूनच लोक त्या
रोषणाईचा आणि फटाक्यांच्या आतिषबाजीचा
मनमुराद आनंद लुटू शकतील.
मैलभर लांबीचा हा रस्ता – केवळ रस्ता
न रहाता त्याची मायानगरी बनेल.




ब्लॅकपूलचा झगमगीत किनारा

गाडीत बसूनच बघता येणारी ब्लॅकपूलची रोषणाई







a

या सगळया मौजमजेचा आरंभ -
वास्तवात मध्यान्हीच झालेला आहे.
पण त्या स्वप्ननगरीतून बाहेर पडायला मात्र,
सहजच पहाटही उगवू शकते.

प्रवाशांचे थवे भरभरुन येत असतात.
गडबड, गोंधळ, गोंगाट यांना ऊत आलेला असतो.
प्रत्येक जण अबालवृध्द इथे-
आयुष्याची मजा लुटायला आलेला असतो.

लहान मुलांना भरपूर खाण्यापिण्याचं -
फुगे उडवण्याचं, रंगीबेरंगी टोप्या घालून,
हिंडण्याचं आणि जत्रेसारख्या विजेच्या
पाळण्यांमधे बसण्याचं आकर्षण असतं.

तरुणांना गटागटानं हिंडण्याचं -
उंचात उंच, सर्वात गतीमान आणि
वेडयावाकडया उडया घेत फिरणाऱ्या
‘रोलर कोस्टर’ यंत्रांचं साहस करायचं असतं.
जोडीला कर्णकर्कश संगीताची

धुंदी चढत असते ती वेगळीच.

खाण्यापिण्याची मौजमजेची लयलूटच असते.




**“जीवाचं ब्लॅकपूल” करण्याची काही चित्रे**

बाकी लोकही आपलं वय – हुद्दा –
आणि सगळी समाजबंधनं झुगारुन,
आजचा दिवस स्वतंत्रपणे, मस्तीत
घालवण्यासाठीच केवळ आलेले असतात.
त्यांचेसाठी तो एक ‘उनाड दिवस’ असतो.
सगळ्या वातावरणावरच धुंदी असते.
उघडझाप करणाऱ्या -
दिव्यांचा न्याराच झगमगाट -
आवाजांचा संमिश्र गोंगाट -
(जो तारस्वरात बोलेल तोच टिकेल)
मौजेच्या यंत्रांचा खडखडाट -
पैशांच्या यंत्रखेळांची खणखण -
कोणाची जीत, कोणाची हार.
सारेच कृत्रिम आणि क्षणभंगुर -
सारीच स्वप्ने आणि सारेच आभास -
पण येणारा प्रत्येक जण -
रंगून जातो – दंगून जातो
“जो आला तो रमला” अशी
प्रत्येकाची स्थिती होते.

a

हौसेला मोल नसतं हेच खरं.
भरपूर “मोल” देऊन दिवसाची पुरेपूर
मजा लुटण्यासाठी, प्रत्येक इंग्लंडवासी
कमीतकमी एकदा तरी ब्लॅकपूलला भेट देऊन जातोच!

ब्लॅकपूलचा समुद्र त्यामुळे तृप्त असतो.
येवढं नाव, येवढी लोकप्रियता आणि येवढं वैभव,
ज्या सागरकिनाऱ्याच्या वाटेला येईल -
त्यानं अभिमान कां बाळगू नये ?

अभिमान रास्तच पण अहंकार किंवा गर्व नको.
प्रत्येक मनुष्य जसं आपलं आपलं
नशीब बरोबर घेऊन आलेला असतो, तसेच
भिन्न प्रकृतीचे हे दोन सागर किनारे.

**सेंट ॲन्स** त्याच्या साधेपणानं काही लोकांना भावतो,
तर **ब्लॅकपूल** त्याच्या भपक्यानं बाजी मारतो !

**नसीब अपना अपना** – हेच खरं !

# लेखांक ७

# जलगौरी – सुरम्य आठवणी

## पार्श्वभूमी

दिनांक १० डिसेंबर १९७६ रोजी, भारतीय बनावटीचं, सिंदिया कंपंनीच्या मालकीचं एक व्यापारी जहाज, मॅंचेस्टर कालव्याच्या किनाऱ्यावर (मॅंचेस्टर शिप कॅनॉल) एक दोन दिवस मालाची चढउतार करण्यासाठी थांबणार होतं. त्या बोटींना ‘जल’ शब्दाने सुरु होणारी आकर्षक नावे दिलेली असत (जलजवाहर, जलपालक, जलमणी ई). त्यापैकी “**जलगौरी**” हे जहाज घेऊन आमचे एक मित्र कॅप्टन आपटे आले होते. त्यांनी आम्हा २/३ फॅमिलीजना त्यांच्या बोटीवर संध्याकाळी जेवायला येण्याचं निमंत्रण दिलं होतं.

आमच्यापैकी काही लोकांनी (त्यात माझाही समावेश होताच)- आतापर्यंत केवळ विमानानेच प्रवास केलेला असल्यामुळे, प्रत्यक्ष बोटीवरच्या वातावरणाची आम्हाला फक्त ‘सुरसरम्य’ कथांमधेच माहिती

झालेली होती. त्यामुळे बोटीवरचा अनुभव आणि प्रत्यक्षात तिथलं वातावरण कसं असतं वगैरे ‘सत्ये’ जाणून घेण्याची खूपच उत्सुकता होती.

कॅप्टन आपटेंबद्दल विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, अनेक वर्षे जहाजाची ने-आण करुन आणि महिनोंन् महिने त्या वातावरणात राहूनही त्यांनी दारुच्या थेंबालाही स्पर्श केलेला नव्हता. फुरसतीच्या वेळात स्वतःची करमणूक करण्यासाठी, हार्मोनियम वाजवून, त्यावर भजनं गाण्याचा छंद त्यांनी जोपासला होता. कॅप्टन आपटे आज जिथे कुठे असतील, तिथे त्यांना माझा **मन:पूर्वक प्रणाम!!**



सरोज सहस्रबुद्धे, कॅप्टन आपटे व गोठीवरेकर दांपत्य



**मॅंचेस्टर शिप कॅनॉलचा एक भाग**

a

# जलगौरी – सुरम्य आठवणी

भिजलेली अंधारी संध्याकाळ,

अंगाला बोचणारी थंडी

चिकचिकणारे रस्ते

आणि निसरडी झालेली वाट.

* * *

तीन गाडया वेगाने धावंत असतात.

पिवळ्या दिव्यांच्या उजेडानं गढुळलेले,

हिरवे-नारिंगी-तांबडे रंग डोळ्यांपुढून सरकतात.

कांचेच्या झांकोळलेल्या तावदानांतून अंधूक दिसणारे चेहरे,

नऊ मोठे आणि पांच छोटे.

दाटीवाटीची मांडणी.

छोटया चेहऱ्यांवर आनंद व उत्साह,

पुरुषी चेहरे वरुन निर्विकार पण आंत उत्साह लपवण्याची धडपड,

नाजुक, रंगीत, बायकी चेहऱ्यांखाली दडलेली हुरहूर.

a

* * *

नव्या जगाचे – नव्या दुनियेचे प्रवेशद्वार दिसूं लागते.

साऱ्या डोक्यांची मोजणी होते,

आंत प्रवेश करण्याचा परवाना मिळतो-

आणि मग सारे त्या नव्या दुनियेशी येऊन पोहोचतात.

* * *

गाडया थांबतात, सारे उतरतात.

डोळयांसमोर भव्य अक्षरे तरळतात **“जलगौरी’.**

एक अवाढव्य नौका भारतीय नांवाचा शृंगार चढवून अभिमानाने उभी असते-

विलायतेतील मॅंचेस्टर कालव्याच्या किनाऱ्यावर !

दृष्टीच्या कक्षेत न मावणारा आकार आणि विस्तार,

गोल खिडक्यांतून हळूच बाहेर निसटणारा मंद प्रकाश.

आंतील दुनिया वेगळी असते –

खूप उंच, खूप रुंद आणि कांहीशी धुंद !

* * *




**जलगौरी सारखं मालवाहू जहाज**

आंत प्रवेश करण्यासाठी डुगडुगता जिना –

दोरखंडाने एकमेकांना जखडून बांधलेल्या लाकडी फळ्यांचा.

पाऊल पडले की हलणारा – झोके घेणारा जिना,

सारे चढू लागतात.

मुले आनंदतात पण घाबरतातही.

मोठे मुलांमागे भीती लपवतात.

a

* * *

त्या जगांतला एक वाटाडया बरोबर असतो.

तो मार्ग दाखवतो, सर्व मागाहून पावले टाकतात.

त्याची छाती अभिमानानं भरुन येते.

त्याचा त्या आंतील दुनियेवर अधिकार असतो,

आणि आंतील दुनियेचा त्याचेवर !

तो तेथील आर्थिक जबाबदारी सांभाळतो.

* * *

जिन्याच्या शेवटी, त्या दुनियेच्या आकाराला साजेसे भव्य प्रवेशद्वार,

आंत निमुळते – बोगद्यांसारख्या रस्त्यांचे जाळे,

दुतर्फा, साधर्म्यामुळे गोंधळ माजवणारे दरवाजे,

सारेच सारखे – नव्यांना हमखास चुकायला लावणारे.

* * *

गुंतागुंतीच्या चक्रव्यूहांतून वाट काढीत-

अधिकारी त्यांना खाद्यगृहाकडे नेतो.

a

प्रशस्त दालनाच्या भिंतीवर बसवलेल्या छोटया छोटया खिडक्या,

लांबच लांब टेबले – भोवती बऱ्याचशा खुर्च्या

सारे नीटनेटके, स्वच्छ आणि शिस्तीचे.

दिव्यांमधून झिरपणारा मंद उजेड,

शुध्द हवा खेळवणारे विजेचे पंखे,

खोली साधीच पण वातावरण कांहीसे गूढ, काहीसे उत्तेजक !

* * *

सारे त्या वातावरणांत विसावतात,

शब्दांची भेंडोळी फेकली जातात,

हास्यांचे फवारे उडतात,

मद्याच्या बाटल्या उघडल्या जातात,

ग्लास भरले जातात आणि रिकामे होतात.

* * *

नौकेवरील नवीन नवीन अधिकारी

त्या छोटयाश्या रंगभूमीवर प्रवेश करतात.

a

काहींचे काम छोटे असते तर काहींचे मोठे,

पण साऱ्या चेहऱ्यांवर तीच उत्सुकता व तेच आदरातिथ्य.

एकमेकांबद्दलच्या माहितीची देवाण-घेवाण आणि खुर्च्यांची अदला-बदल-

भाषा वेगळया, विचार वेगळे, संस्कार वेगळे पण उत्पत्ती एकच - भारतीय !

नवीन प्रवेश करणारा क्षणभर भांबावतो व मग सामावून जातो.

संख्या वाढत रहाते.

आवाज वाढतात,

आणि पेये घेण्याचा वेगही वाढतो.

हास्यविनोद ऊतू जातात,

कांही सुसंबंध्द पण बरेचसे असंबध्द,

धुंदी चढलेले अधिक – न चढलेले त्यामानाने कमी.

* * *

मधूनच एखादा उठतो,

नौकेच्या गोलाकार डोळ्यांतून बाहेर डोकावतो,

a

चमचमणारे असंख्य दिवे,

खळाळणारं पाणी,

लांबवर पसरलेली अंधाराची रेखा,

हे सारे न्याहाळून, स्वतःला त्यांत शोधण्याचा प्रयत्न करतो,

मग कांहीसा निराश होऊन पुन्हां आंतील वातावरणांत मिसळून जातो.

दुसऱ्या कुणाच्या भावना, भूतकालांतील आठवणींनी हेलावतात.

मुलं आनंदानं नाचत बागडत असतात;

आणि स्त्रिया ? त्या धुंद वातावरणातही आलिप्त रहाण्याची –

मनावेगळी धडपड करीत असतात.

* * *

लवकरच येण्याच्या मुख्य उद्देशाला सुरुवात होते.

विविध खाद्यपदार्थ समोर येऊ लागतात,

त्यांचे अनेक प्रकार, आकार आणि सुगंध असतात.

सारे कडाडलेले असतात,

a

भान हरपून त्या साऱ्यांचा समाचार घेतात.

कोणी एक अधिकारी गिटार वाजवून त्यांचं मनोरंजन करतो.

बाकी अधिकारी त्याला गावून साथ करतात.

आलेल्या पाहुण्यांचं आंतील अधिकाऱ्यांनी केलेलं स्वागत असतं ते –

* * *

आता मध्यरात्र उलटलेली असते.

मद्य आणि जेवण यांचा साऱ्यांवर अंमल चढलेला असतो

मुले पेंगुळतात,

मोठयांचे शब्द व शरीरे जडावलेली असतात,

गाण्यांचे सूर असंबध्द होत चाललेले आणि

थकव्यावर तृप्तीचा साज चढलेला.

* * *

अखेर निरोपाचा क्षण जवळ येतो.

क्षणांत पार पडणारा निरोप समारंभ, घटकाभर चालतो.

पत्त्यांची देवाण – घेवाण,

a

निमंत्रणांची उलटा – पालट,
प्रेमभराने केलेली हस्तांदोलने आणि
पुन्हा भेटण्याची आश्वासने.
शब्दांची चक्रे मागे-पुढे फिरतात,
भावना सुखावल्या – दुखावल्या जातात,
चेहऱ्यावर हास्य असतांनाच डोळयांत आंसू जमतात,आणि
त्या दुनियेचा निरोप घेऊन प्रवासी परतीच्या मार्गाला लागतात.
रात्रीच्या काळोखांत असंख्य दिव्यांनी उठून दिसणारे ते विश्व-
हळूंहळूं मागे पडून, कांही क्षणांत पार दिसेनासे होते.

* * *

पहाटे – पहाटे – रात्रीच्या आठवणी पुसट होत असतांनाच,
ती नौका आपले उद्दिष्ट गांठण्यासाठी,
दूर दूर- दुसऱ्या किनाऱ्याकडे चालायला सुरुवात करते.
त्या धुंद वातावरणात काही काळ आनंदानं जगलेले क्षण,
बोटीबरोबरच मागे सरकू लागतात.
नवीन क्षणांचं स्वागत करायला नवा दिवस उगवत असतो.
आणि मागे रेंगाळत असतात त्या फक्त आठवणी !
कधीही परत न येणाऱ्या “भारावलेल्या” क्षणांच्या आठवणी !

सागराच्या पृष्ठभागावर – नौका दूर सरकत असतांना,
उठणाऱ्या फेंसासारख्या – कालांतराने
तळाशी खोल खोल जाऊन दडणाऱ्या !




**मॅंचेस्टर शिप कॅनॉल**

# समारोप करतांना

“तूच कर्ता आणि करविता शरण तुला भगवंता
तुझिया श्वासे पान हलते, हर्षे तुझिया फूल फुलते
तेज झळाळत गगनही झुलते रविचंद्राचा तू निर्माता.
सुखदुखा:ची ऊनसाउली तुझीच जाणिव वेळोवेळी”

**तूच असता माझी पूर्ती मागायाचे काय अनंता**

सर्वेत्र सुखिन: संतु सर्वे संतु निरामया:
सर्वे भद्राणि पश्यंतू मा क:श्चित दु:खितो भवेत

**समस्त वाचक मंडळी सदैव सुखी आणि आनंदी राहोत.**



**या लेखनाचा समारोप हा नवीन लेखनाचा आरंभ ठरू दे हीच परमेश्वरचरणी नम्र प्रार्थना !!!**

# परिशिष्ट

## लेखिकेसंबंधी थोडेसे (महाराष्ट्र आणि इंग्लंड)

### शिक्षण :

- बी.एस्सी (प्रताप कॉलेज अंमळनेर-पुणे विद्यापीठ) प्रथम आल्याबद्दल कॉलेजचे पारितोषिक.

- एम.एस्सी व पी.एचडी (व्हिक्टोरिया युनिव्हर्सिटी – मँचेस्टर, इंग्लंड) जीवशास्त्र विषयात ५ वर्षे संशोधन करून.

### अनुभव :

- कमलाबाई कन्या विद्यालय - धुळे

(३  वर्षे शिक्षिका म्हणून नोकरी)

- युनिव्हर्सिटी ऑफ मँचेस्टर – इंग्लंड

(३ वर्षे बी.एस्सीच्या विद्यार्थ्यांसाठी डेमॉन्स्ट्रेटर)

- ख्रिस्ती कॅन्सर हॉस्पिटल आणि होल्ट रेडियम इन्स्टिट्यूट – मॅचेस्टर

(७ वर्षे कॅन्सर संशोधन क्षेत्रात काम)

a

# कार्य :

●मराठी जनतेसाठी **कॅन्सर-शिक्षणाच्या प्रचाराचे कार्य**

(१५ वर्षे - पुणे आणि इतर शहरे)

●सुमारे शंभर **लेख आणि लेखमाला** प्रसिध्द

(विविध दैनिके, साप्ताहिके, मासिके, स्मरणिका, दिवाळी अंक)

●**समाजप्रबोधन आणि जनजागृती**

(महिला मंडळे, शाळा, महाविद्यालये, कार्यालये, रोटरी क्लब्ज इत्यादी संस्थांमधे भाषणे, चर्चा, प्रश्नोत्तरे)

●**आकाशवाणी, पुणे**

(भाषणे, चर्चा, मुलाखती)

●**सल्लागार** – विदर्भ कॅन्सर रिलीफ सेंटर, कारंजा (जि. आकोला)

●**सहसंपादन**

▪फुलराणी दिवाळी अंक (शहादा)

▪दीनदयाळ हॉस्पिटल आणि कॅन्सर रिसर्च सेंटर (“दीनदयाळ वार्ता” हे मुखपत्र)

▪हृदयरोग स्मरणिका (दीनदयाळ हॉस्पिटल)

●**अध्यक्ष** – श्री. सरस्वती शिशु मंदिर व प्राथमिक विद्यालय, कोथरूड, पुणे.

●**डायरेक्टर** – कॅन्सर एज्युकेशन कॅम्पेन – केअर इंडिया मेडिकल सोसायटी, पुणे.

●**सहसंचालक** – होलिस्टिक क्लिनिक – सर्व प्रकारच्या रुग्णांसाठी विविध उपचार पध्दती केंद्र, पुणे

●**संचालन** – कॅन्सर दिलासा केंद्र – कॅन्सररुग्ण आणि त्यांचे नातेवाईकांसाठी मदत योजना व सल्ला (विनामूल्य), पुणे.

●**लेखन** - १९८५ – २०२० या काळात कॅन्सर आणि आरोग्याच्या विविध विषयांवर बारा पुस्तके प्रकाशित (तपशील खाली)

**सन्मान :**

●**प्रमुख पाहुणी व अध्यक्ष** – हिरक महोत्सव आणि ६१वा वर्धापन दिन, कमलाबाई कन्याशाळा, धुळे, १९८८

●**भाषणासाठी निमंत्रण** – टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या सुवर्णमहोत्सवी जागतिक परिषदेनिमित्त. १९९२, मुंबई.

●**सन्मानकरी** – अखिल भारतीय मराठी विज्ञान परिषद, धुळे. डिसेंबर १९९४.

## इतर :

●आरोग्यावरील लेखनाबरोबरच- संगीत, चित्रकला, काव्य, नृत्य इत्यादी विषयांवर ललित लेखन, समीक्षणात्मक लेख, मुलाखती इत्यादी प्रसिध्द. (इंग्लंड आणि महाराष्ट्र)

●होमिओपॅथी, मॅग्नेटोथेरपी, योगासने, फोटोग्राफी, वाचन, ज्योतिष, प्रवास, इत्यादी विषयांची आवड व छंद.

●जर्मन-फ्रेंच आणि संगणकांच्या भाषा यांचा अल्पसा अभ्यास.

●संगीत (शास्त्रीय संगीत, हार्मोनियम, की-बोर्ड, व्हायोलिन, सतार आणि संगीत संग्रह) यांचेमधे रुची.

●हस्तकला, गृहसजावट, शिवणकला, भरतकाम यांचा दीर्घकाळाचा छंद.

●टेबल टेनिस, बॅडमिंटन, टेनिस, पोहणे एकेकाळचे आवडते उपक्रम.

a

# प्रकाशित पुस्तके

| | पुस्तकाचे शीर्षक | पृष्ठ संख्या | प्रकाशन दिनांक | प्रकाशक |
|---|---|---|---|---|
| १ | **कॅन्सरची कहाणी** | ४४४ | १ डि.१९८५ | प्रपंच प्रकाशन पुणे |
| २ | **कॅन्सरपासून बचाव** | १०७ | २६ जाने.१९८७ | प्रपंच प्रकाशन |
| ३ | **कॅन्सरशी झुंज** | १५५ | २८ ऑगस्ट १९८७ | प्रपंच प्रकाशन |
| ४ | **कॅन्सर आणि आपण** | ९० | १ जून १९९० | प्रपंच प्रकाशन |
| ५ | **आमचा काय दोष (सरोज सहस्रबुध्दे व अनु भागवत)** | ११५ | २८ डि.१९९२ | साधना प्रकाशन पुणे |
| ६ | **कॅन्सर और हम** | ८० | २६ जाने.१९९५ | परिमल प्रकाशन औरंगाबाद |
| ७ | **परिचय शरीराचा** | १५३ | २६ जाने.१९९५ | परिमल प्रकाशन |
| ८ | **विकार-व्याधी-उपाधी** | ११८ | १ मे १९९५ | परिमल प्रकाशन |
| ९ | **रोगचिकित्सा-रोगनिदान** | ११२ | २० एप्रिल १९९६ | परिमल प्रकाशन |
| १० | **असे इलाज-असे उपचार** | १२० | १५ जून १९९८ | परिमल प्रकाशन |

a

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | **आरोग्य-स्वच्छता-स्वास्थ्य** | १०८ | २० एप्रिल १९९६ | परिमल प्रकाशन |
| १२ | **परिचय शरीराचा (द्वितीय आवृत्ती)** | २७५ | जानेवारी २०२० | परिमल प्रकाशन |

# ई – पुस्तक

| | | | |
|---|---|---|---|
| **कलाप्रवास – मायदेश ते परदेश** | १२० | २० जुलै २०२२ | ई – साहित्य प्रतिष्ठान |

a

https://youtu.be/bMqW0hleNdo

